cmyk

## संपादकीय

### कोरटकरप्रमाणे भय्याजी जोशी चिल्लर असतील का?

घाटकोपरची भाषा गुजराती आहे. मुंबईत येणाऱ्या प्रत्येकाने मराठी शिकलीच पाहिजे असे नाही, असे वक्तव्य राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ नेते भय्याजी जोशी यांनी केल्यामुळे त्याचे पडसाद राज्यासह विधानसभा आणि विधान परिषदेतही उमटले. या वक्तव्यावरून चौफेर टीका झाल्याने भय्याजी यांनी अखेर यू-टर्न घेत सारवासारव केली. इतके सारे कळते तर भय्याजी यांनी नसते उपद्व्याप का केले? राज ठाकरे यांच्या शब्दांत विचारायचे झाल्यास, जोशीबुवांनी काड्या घालण्याचे काम का केले?


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-३१६ | सोमवार, दि.१० मार्च २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये


### विविध विकास निर्देशांकात चंद्रपूर जिल्हा राज्यात प्रथम

चंद्रपूर : चंद्रपूर जिल्हा प्रशासनाच्या उत्कृष्ट कार्याची दखल शासन स्तरावरून घेण्यात येत असून चंद्रपूरच्या शिरपेचात रविवारी (दि.९) आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. विविध विकास निर्देशांकात चंद्रपूर जिल्ह्याने राज्यातून प्रथम क्रमांक पटकाविला आहे. यासाठी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांना सन्मानित करण्यात येणार आहे. सांख्यिकी विभागाकडे असलेल्या तपशीलाच्या आधारे पुणे येथील विख्यात 'गोखले अर्थशास्त्र संस्थेतर्फे' विविध जिल्ह्यांच्या कामगिरीचे विश्लेषण करण्यात आले. त्यानुसार चंद्रपूर जिल्ह्याने जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या मार्गदर्शनात विविध विकास निर्देशांकात प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

# कर्जमाफी ते दिवसा वीजपुरवठ्यासाठी शेतकरी आक्रमक

## विविध मागण्यांसाठी रघुनाथ पाटलांच्या नेतृत्वाखाली एल्गार, १९ मार्चला पुण्यात धरणे आंदोलन

पंढरपूर। प्रतिनिधी

**रघुनाथ दादा पाटील यांच्या शेतकरी संघटनेच्यावतीने राज्यभरात १९ फेब्रुवारी ते १९ मार्च दरम्यान संपूर्ण कर्जमुक्तीसाठी जागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानाची सांगता पुणे येथे १९ मार्च रोजी एक दिवसीय धरणे आंदोलनाने होणार असल्याचे शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रघुनाथदादा पाटील यांनी पंढरपूर येथे सांगितले. या संपूर्ण कर्जमुक्ती अभियानाच्या माध्यमातून एक महिना राज्यभरातील विविध भागातील शेतकऱ्यांचे जनजागृती केली जात आहे.**



### शेतकऱ्यांना काय मिळणार ; अर्थसंकल्पाकडे लक्ष

राज्याचे अर्थमंत्री अजित पवार सोमवारी राज्याचा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. शेतकऱ्यांना अर्थसंकल्पात कर्जमाफी, नमो शेतकरी सन्मान योजनेच्या निधीत वाढ, कापूस आणि सोयाबीनसाठी भावांतर योजना आणि ठिबक, शेततळे तसेच विहीर अनुदानात वाढ करण्याची अपेक्षा आहे. पण आता अजितदादा अर्थसंल्पात काय घोषणा करतात आणि शेतकऱ्यांच्या कोणत्या अपेक्षा पूर्ण होतात, हे सोमवारीच कळेल.

महाराष्ट्रातील सर्व शेतकरी, शेतमजूर, बारा बलुतेदार यांची कर्जातून मुक्तता करावी असे मत रघुनात दादा पाटील यांनी व्यक्त केले. दुधासह सर्व शेतीमालास उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळावा. शेतीपंपासाठी दिवसा पूर्ण दाबाने वीज पुरवठा करण्यात यावा. उसाला प्रति टन ५००० रुपये भाव मिळावा. दोन कारखान्यामधील अंतराची अट रद्द करण्यात यावी. वन्य प्राणी संरक्षण कायदा रद्द करण्यात यावा या मागण्यांसाठी हे जागृती अभियान राज्यभरातील विविध जिल्ह्यांमध्ये सुरु आहे. याचा सांगता समारंभ १९ मार्च रोजी पुणे पान २ वर

# आज सादर होणार राज्याचा अर्थसंकल्प

## शेतकरी, उद्योजक अन् व्यापाऱ्यांसह संपूर्ण राज्याचे अजित पवार यांच्याकडे लक्ष




मुंबई । पतिनिधी

**महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार सोमवार दि. १० मार्च रोजी राज्याचा वर्ष २०२५-२६ चा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. नव्याने सत्तेवर आलेल्या महायुती सरकारचा हा पहिला अर्थसंकल्प असून अर्थमंत्री म्हणून अजित पवार यांचा हा अकरावा अर्थसंकल्प असणार आहे. शेषराव वानखेडेंनंतर अजित पवार सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प सादर करत आहेत.**

शेतकरी, कष्टकरी, महिला, दलित, आदिवासी, विद्यार्थी, युवक हे घटक अजित पवारांच्या अर्थसंकल्पाच्या केंद्रस्थानी राहिले आहेत. २०२१ चा अर्थसंकल्प ८ मार्च जागतिक महिला दिनी जाहीर करताना त्यांनी तो राज्यातील महिला शक्तीला समर्पित केला होता. २०२२ चा अर्थसंकल्प स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मृतीदिनी ११ मार्च रोजी सादर केला होता. तो छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य, त्याग, समर्पण, स्वराज्यनिष्ठेला समर्पित होता. कृषी, उद्योग, दळणवळण, आरोग्य, मनुष्यबळ विकास या पंचसूत्रीवर आधारीत अर्थसंकल्पही पान २ वर

### अजित पवारांचा हा विक्रमी अकरावा अर्थसंकल्प

उपमुख्यमंत्री अजित पवार हे सोमवारी त्यांचा अकरावा अर्थसंकल्प सादर करतील. त्यानंतर ते शेषराव वानखेडे यांच्यानंतर (१३ वेळा) दुसरे सर्वाधिक (११) वेळा अर्थसंकल्प सादर करणारे अर्थमंत्री ठरतील. त्यांच्यानंतर सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प सादर करण्याचा मान जयंत पाटील (१० वेळा) आणि सुशीलकुमार शिंदे (९ वेळा) यांना जातो.

# अजितदादा, तुमच्या आमदारामुळे राज्य नासत चाललय, त्याला पाठीशी घालू नका

## न्याय मागताना वैभवी देशमुखला अश्रू अनावर ; हत्येच्या निषेधार्थ बारामतीत भव्य मोर्चा

बारामती । प्रतिनिधी

अजितदादा, तुमच्या आमदारामुळे राज्य नासत चालले आहे, त्याला पाठीशी घालू नका, आम्हाला न्याय द्या अशी मागणी दिवंगत सरपंच संतोष देशमुखांची मुलगी वैभवी देशमुखने केली. त्यांच्यासारख्या लोकांमुळे आमच्यासारख्यांचे जगणे मुश्कील झाले असल्याचे वैभवी देशमुख म्हणाली. ज्या खंडणीसाठी माझ्या वडिलांचा जीव गेला ती कुणासाठी मागितली जात होती? माझ्या वडिलांचा गुन्हा काय होता? असे प्रश्नही तिने विचारले. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुखांच्या हत्येच्या निषेधार्थ बारामतीमध्ये मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने सोमवारी सर्वधर्मीय मोर्चा आयोजित करण्यात आला होता. यावेळी संतोष देशमुखांची मुलगी वैभवीला अश्रू अनावर झाले.



यावेळी वैभवी म्हणाली, अजित पवारांना विनंती आहे की माझे वडील गेलेत आम्ही न्याय मागतोय. आम्हाला लवकरात लवकर न्याय द्या. या प्रकरणाची खोलवर जाऊन चौकशी करा. तुमच्या पक्षातील एक जे आमदार आहेत त्यांच्यामुळे हे राज्य नासत चालले आहे. त्याला तुम्ही पाठीशी घालू नका. त्यांच्यामुळे आमच्यासारख्या सर्वसामान्य लोकांचे जगणं मुश्कील झाले आहे. अजित दादांना पान २ वर

# खोक्या भाईचे वनविभागाच्या जागेवर अतिक्रमण

शिरूर । प्रतिनिधी

**आमदार सुरेश धस यांच्याशी जवळीक असलेल्या सतीश भोसले उर्फ खोक्या बाबत दररोज नवनवीन खुलासे होत आहेत. भाजपचा पदाधिकारी असलेल्या खोक्या भाईने पैसा आणि दहशतीच्या जोरावर दबदबा निर्माण केला आहे. अशातच आता खोक्याने वनविभागाच्या जमिनीवर अतिक्रमण केल्याची धक्कादायक बाब पुढे आली आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार सतीश भोसले राहत असलेली शिरूरजवळील झोपेवाडी येथील जागा वनविभागाची आहे. या जागेवर खोक्या अतिक्रमण करून राहत आहे. अनेक दिवसांपासून खोक्यासह त्याचे कुटुंब याठिकाणी राहत असल्याची माहिती आता समोर आली आहे. ही बाब पुढे आल्यानंतर अद्यापही खोक्यावर कारवाई का झाली नाही, असा प्रश्न उपस्थित केला जातो आहे. सतीश भोसलेचे ऐवढे कारनामे समोर येत असताना देखील पान २ वर

# आजपासून संसद अधिवेशनाचा दुसरा टप्पा

## सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये विविध मुद्द्यांवरून जुंपण्याची चिन्हे



नवी दिल्ली। वृतसंस्था

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातील दुसऱ्या टप्प्याचे कामकाज आजपासून (सोमवार) सुरू होईल. अधिवेशनाच्या उर्वरित काळात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये विविध मुद्द्यांवरून जुंपण्याची शक्यता आहे. त्यामुळे अधिवेशनाचा दुसरा टप्पा वादळी ठरण्याची चिन्हे आहेत.

अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्याचे कामकाज ३१ जानेवारी ते १३ फेब्रुवारी या कालावधीत झाले. त्यानंतर घडलेल्या काही घडामोडींमुळे सत्ताधाऱ्यांना घेरण्यासाठी आणखी मुद्दे विरोधकांच्या हाती आले आहेत. त्यामुळे मोदी सरकारची कोंडी करण्यासाठी विरोधकांना आणखीच बळ मिळणार आहे. प्रामुख्याने मतदार याद्यांमधील कथित अनियमितता, मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचाराची पडलेली पान २ वर

### विविध विधेयकांवरून होणार खडाजंगी

अधिवेशनात विरोधकांना निष्प्रभ ठरवण्याचे आव्हान सत्ताधाऱ्यांपुढे असेल. लेखानुदान मागण्यांना मंजुरी, अर्थसंकल्पीय प्रकिया पूर्णत्वास नेणे आदींवर सरकारचा भर असेल. वक्फ सुधारणा विधेयक मार्गी लावण्यालाही सरकारचे प्राधान्य असेल. त्याउलट, इंडिया आघाडीने त्या विधेयकाला जोरदार विरोध करणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे संबंधित विधेयकावरून संसद ढवळून निघण्याची शक्यता आहे.

# माझ्या जन्मदात्या आईबद्दल काही बोलाल तर याद राखा

## धनंजय मुंडे यांचा आक्रमक होत सुरेश धस यांना इशारा

बीड । प्रतिनिधी

**आ.सुरेश धस यांनी माजी मंत्री धनंजय मुंडेंबाबत बोलताना मोठा गौप्यस्फोट केला होता. धनंजय मुंडे हे वाल्मिक कराडच्या एवढे आहारी गेले होते की, त्यामुळे त्यांचे कुटुंब देखील त्यांच्यावर नाराज असेल, त्यांची आई तर गेल्या दीड वर्षांपासून मुळ गावी नाथ्रा येथे गेल्या आहेत, त्या अजून आल्या नाहीत असे सुरेश धस यांनी म्हटले होते. दरम्यान धस यांच्या या विधानानंतर आता धनंजय मुंडे चांगलेच आक्रमक झाले आहेत. त्यांनी ट्विट करत सुरेश धस यांना जन्मदात्या आईबद्दल न बोलण्याचा इशारा दिला आहे.**



परळी वैजनाथ शहरातील पंढरी या माझ्या निवासस्थानाचे नूतनीकरणाचे काम हाती घ्यायचे असल्याने मी, माझी आई व कुटुंबीय मागील काही महिन्यांपासून आमच्या नाथरा या जन्म गावात असलेल्या शेतातील घरात स्थलांतरित झालो आहोत, तिथेच राहत आहोत, ही गोष्ट सर्वांनाच माहित आहे. ज्यांनी आरोप केले त्यांनीच या आधी एका मुलाखतीत मी शेतातील घरात राहतो असे सांगितले होते मात्र आता त्यांनी फक्त माझी आई राहते असे सांगितले आणि खोटे नाटे आरोप केले. माझे चुलत भाऊ हे प्रत्येक निर्णयात माझ्या सोबतीने भक्कमपणे उभे असतात, हेही सर्वांना माहित आहे मात्र त्याबाबतीतही चुकीचे आरोप केल्या गेले आहेत. मागील काही महिन्यांपासून माझ्यावर सातत्याने आरोप केले जात आहेत. मात्र आता कदाचित आणखी काही खोटे आरोप करायला शिल्लक पान २ वर

# भाजपा हिंदुत्त्ववादी पक्ष हाच मोठा फेक नरेटीव्ह

## उद्धव ठाकरेंचा मुंबईतून हल्लाबोल

मुंबई । प्रतिनिधी

भाजपा हिंदुत्त्ववादी पक्ष, हाच मोठा फेक नरेटीव्ह आहे, अशी घणाघाती टीका उद्धव ठाकरे यांनी केली आहे. गच्चीत काठ्या घेऊन बसणारे लोक आज देश चालवत आहेत, असा टोलाही त्यांनी भाजपाला लगावला. मुंबईतील पक्षाच्या शिबिरात बोलताना त्यांनी भाजपा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लक्ष्य केले.

उद्धव ठाकरे म्हणाले, गच्चीत काठ्या घेऊन बसणारे लोक आज देश चालवत आहेत. भाजपा हिंदुत्त्वावादी पक्ष आहे, हाच मोठा फेक नरेटीव्ह आहे. भाजपाचे लोक मला विचारतात, की तुम्ही कुंभ मेळ्यात डुबकी मारायला का गेले



नाहीत, पण मी सांगितले होते की मोहन भागवत गेले की मीही जाणार आणि डुबकी मारणार, पण ते गेले नाहीत मग मी पण गेलो नाही, असे उद्धव ठाकरे म्हणाले. पुढे बोलताना त्यांनी मराठीच्या मुद्द्यावर भैय्याजी जोशी यांनाही लक्ष्य केले. काल परवा अनाजी पंत जोशींनी घाटकोपरची भाषा मराठी नाही असे म्हटले आहे. आम्ही त्यांच्या विधानाचा पान २ वर

# जीएसटी दर कमी करणार-अर्थमंत्री सीतारामण

नवी दिल्ली वृत्तसंस्था

भारताकडून आकारण्यात येणाऱ्या आयात शुल्काच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेत येणाऱ्या भारतीय मालावरही तितकेच आयात शुल्क अर्थात रिसीप्रोकल टॅक्स आकारणार असल्याची घोषणा केली होती. तसेच अमेरिकन प्रसारमाध्यमांशी बोलताना भारताच्या कर पद्धतीला एक्सपोज केल्यामुळे आता करात कपात करण्याची तयारी दर्शविली असल्याचे सांगितले. त्यास २४ तासही पूर्ण होत नाही तोच अर्थमंत्री पान २ वर



### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.७ मार्च २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १३५.०० क्विंटल | २,५९७ | ३,०५१ | २,७७८ |
| ज्वारी/हायब्रिड: १५०.५० क्विंटल | २,००० | ३,६०० | २,६३७ |
| मका/लोकल:२०.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर :६.५० क्विंटल | ७,१०० | ७,२०० | ७,१५० |
| उडीद : ७.५० क्विंटल | ५,१०० | ५,१०० | ५,१०० |
| बाजरी: २७.०० क्विंटल | २,०१० | ३,०५१ | २,७१२ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: ५७.०० क्विंटल | ३,९८० | ४,००१ | ३,९९३ |
| हरभरा: २४.५० क्विंटल | ५,१०० | ५,२०० | ५,१७५ |

# घरकुल योजनेत कसलाही गैरप्रकार होता काम नये

## आ.संदीप क्षीरसागरांकडून प्रशासनाला कडक निर्देश

बीड । प्रतिनिधी

**सध्या प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना यांसह शासनाच्या विविध घरकुल योजनेची कामे प्रशासकीय स्तरावर सुरु आहेत. या योजनेतील लाभार्थी हे गरजू आणि वंचित असतात. गरजू आणि पात्र लाभार्थ्यांचे घराचे स्वप्न पूर्ण होण्यास कसल्याही प्रकारचा अडथळा होऊ नये, तसेच या योजनांच्या प्रक्रियेत कुठल्याही स्तरावर आर्थिक मागणी अथवा इतर कसलाही गैरप्रकार होऊ नये याची पुरेपूर दक्षता घ्या. तसेच पात्र लाभार्थींना तातडीने घरकुल हप्ता वितरीत करा, असे कडक निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड नगरपालिका, बीड पंचायत समिती व शिरूर कासार पंचायत समिती व बीड नगरपालिका येथील अधिकाऱ्यांना दिले आहेत.**



सध्या प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत नवीन उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. त्याबाबत ग्रामपंचायत स्तरावर सध्या प्रस्ताव दाखल करून घेणे सुरू आहे. प्रधानमंत्री आवास योजना शहरीचे ऑनलाईन अर्ज दाखल करून घेण्याची प्रक्रिया झाली आहे. रमाई आवास योजनेचे प्रस्ताव ग्रामपंचायत स्तरावरून दाखल करवून घेऊन पंचायत समितीमार्फत समाजकल्याण विभागाकडे दाखल करण्यात आले आहेत तसेच त्रुटी असलेले प्रस्तावांची पुर्तता करणे सुरू आहे. बर्याचवेळा या योजनेतील लाभार्थ्यांकडून अधिकारी आर्थिक मागणी करत असल्याच्या तक्रारी येत असतात. जे नागरिक या योजनेचे लाभार्थी आहेत ते सर्व अतिसर्वसामान्य, गरीब आणि वंचित घटकातील असतात. त्यांची अडवणूक करणे, आर्थिक मागणी करणे किंवा इतर कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार या योजनेच्या कार्यवाहीत होता कामा नये. पान २ वर

### बोगसगिरी आणि लाभार्थ्यांची पिळवणूक अजिबात खपवून घेणार नाही

दरम्यान, घरकूल योजनेचा लाभ घेऊन घर न बांधताच अधिकार्यांच्या संगनमताने रक्कम उचलल्याचे गैरप्रकार जिल्ह्यात समोर आले आहेत. असले प्रकार बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात अजिबात खपवून घेणार नाही. त्यासोबतच लाभार्थ्यांची अधिकार्यांकडून होणारी आर्थिक पिळवणूकही सहन केली जाणार नाही. अशी तंबीही आ.संदीप क्षीरसागरांनी अधिकार्यांना दिली आहे.

### बीड तालुक्याने विशेष लक्ष देण्याची गरज, दिरंगाई चालणार नाही

घरकुलाचा पहिला हप्ता सोडविण्यात बीड तालुका मागे पडला आहे. बीड पंचायत समिती अंतर्गत एकूण २९२९ लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरीत करण्यात आलेला नाही. त्यामुळे बीड पंचायत समितीने विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. याबाबतीत दिरंगाई चालणार नाही. यासोबतच घरकूल संदर्भात बीड नगरपालिकेच्याही अनेक तक्रारी नागरिकांमधून होत आहेत. त्याची तातडीने सोडवणू प्रशासनाने करावी. असेही आ.संदीप क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

cmyk

## अग्रलेख

# कोरटकरप्रमाणे भय्याजी जोशी चिल्लर असतील का?

घाटकोपरची भाषा गुजराती आहे. मुंबईत येणाऱ्या प्रत्येकाने मराठी शिकलीच पाहिजे असे नाही, असे वक्तव्य राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ नेते भय्याजी जोशी यांनी केल्यामुळे त्याचे पडसाद राज्यासह विधानसभा आणि विधान परिषदेतही उमटले. या वक्तव्यावरून चौफेर टीका झाल्याने भय्याजी यांनी अखेर यू-टर्न घेत सारवासारव केली. इतके सारे कळते तर भय्याजी यांनी नसते उपद्व्याप का केले? राज ठाकरे यांच्या शब्दांत विचारायचे झाल्यास, जोशीबुवांनी काड्या घालण्याचे काम का केले? अभिजात भाषेचा दर्जा मिळालेल्या मराठी भाषेचा गौरव २७ फेब्रुवारीला मोठ्या उत्साहात साजरा झाला. शिवाजी पार्कवर झालेल्या मनसेच्या कार्यक्रमात तर अमराठी कलाकारांनी मराठी कविता सादर केल्या. मराठी भाषेचा गौरव करणारे विविध कार्यक्रम आयोजित केले गेले. या उत्साहाला आठवडाभरही उलटत नाही तोच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे वरिष्ठ नेते भय्याजी जोशी यांनी मुंबईत मराठी आली नाही तरी चालते, असे वक्तव्य करून मराठी भाषा प्रेमाच्या फुग्याला टाचणी लावली. या वक्तव्यावरच न थांबता ते असेही म्हणाले की, मुंबई ही बहुभाषिक आहे. उदाहरणार्थ घाटकोपर परिसराची भाषा गुजराती आहे. ढळढळीतपणे मुंबईत येऊन असे वक्तव्य करण्याचे धाडस जोशीबुवांनी कसे काय दाखवले? अर्थात याला कारणीभूत आपण मराठी भाषिकच आहोत. आपण मराठी लोकच संवाद साधताना हिंदीतून सुरुवात करतो. त्यामुळे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला तरी इतर भाषिकांकडून मात्र नगण्य दर्जाच मिळतो. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आहे आणि महाराष्ट्राची राज्यभाषा मराठी आहे. घाटकोपर हा विभाग मुंबईत आहे. मुंबईत मराठी भाषाच अधिकृत आहे हे जोशीबुवांना माहीत नाही काय? जोशीबुवांनी वादग्रस्त वक्तव्य करून मराठी भाषिकांना डिवचण्याचा, मराठी भाषेचे महत्त्व कमी करण्याचा फाजीलपणा केला आहे. त्याचा मराठी भाषिकांनी निषेध करायलाच हवा.

घाटकोपरमध्ये गुजराती भाषिक अधिक राहतात म्हणून घाटकोपरची भाषा गुजराती असा शोध लावणारे खरोखरच धन्य म्हणावे लागतील. मुंबई ही मराठी माणसांची आहे आणि राहील. इतर भाषिक मुंबईत कोठेही राहिले तरी त्यांना मराठी भाषा बोलता आलीच पाहिजे. भय्याजी जोशी यांचे वक्तव्य मराठी माणसाचा अपमान करणारे आहे. त्यांनी मराठी भाषेसंबंधी केलेले वक्तव्य आरएसएसला मान्य आहे काय? मुंबईत कुठलीही एक भाषा नाही, इथे अनेक भाषा बोलल्या जातात असे धक्कादायक विधान करून भय्याजी जोशी यांनी भाषेबद्दल नवा वाद सुरू केला आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतरही सातत्याने मराठी भाषिकांवर अमराठी लोकांकडून हल्ले होत आहेत. मुंबईत मराठी भाषिकांना जागा नाकारल्या जातात. आता मुंबईची मराठी भाषा नाकारली जात आहे. मुंबई तोडण्याची भाषा होत आहे. मुंबई, महाराष्ट्रासाठी १०६ हुतात्म्यांनी आपले बलिदान दिले आहे. त्यांचे बलिदान व्यर्थ कसे जाईल? मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याचे प्रयत्न कदापि यशस्वी होणार नाहीत हे तसा प्रयत्न करणाऱ्यांनी कायम लक्षात ठेवावे. भय्याजी जोशी यांनी आपण मराठी आहोत याचे भान का सोडावे ? जोशीबुवांनी अशा काड्या करू नयेत. त्यांच्या वक्तव्याचा भाजप निषेध करणार आहे का असा सवाल मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी केला आहे. भय्याजी असेच विधान बंगळुरू अथवा चेन्नईत करण्याची हिम्मत दाखवतील काय? मग असे नसते उद्योग करण्याचे कारण काय? भय्याजींच्या वक्तव्याबाबत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, त्यांचे वक्तव्य मी ऐकलेले नाही. त्यामुळे ते पूर्णपणे ऐकून त्यावर माहिती घेऊन बोलेन. मुंबईची, महाराष्ट्र शासनाची महाराष्ट्राची भाषा ही मराठीच आहे. महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येकाने मराठी शिकले पाहिजे. प्रत्येकाला मराठी बोलता आली पाहिजे. इतर भाषांचाही इथे सन्मान होतो. कोणत्याही भाषेचा मी अपमान करणार नाही. त्यामुळे शासनाची भूमिका पक्की आहे असे मुख्यमंत्र्यांनी सभागृहात स्पष्ट केले. मुख्यमंत्र्यांनी कोरटकर हा चिल्लर माणूस आहे असे म्हटले होते. आता त्यांनी भय्याजी जोशी यांना चिल्लर घोषित करून त्यांच्यावर राजद्रोहाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी केली आहे. भय्याजी जोशी यांनी नाहक वाद निर्माण केल्यामुळे मराठी माणूस पेटून उठणे साहजिक आहे.

# ज्ञानसागर गुरुकुल मध्ये जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील ज्ञानसागर गुरुकुल येथे मातृभूमी प्रतिष्ठान व ज्ञानसागर गुरुकुल यांच्या संयुक्त विद्यमाने विविध उपक्रम घेऊन महिला दिन दिनांक ८ मार्च २०२५ रोजी उत्साहात साजरा करण्यात आला .कार्यक्रमास मुख्य मार्गदर्शक म्हणून ब्रेनवे रिसर्च फाउंडेशन पुणे च्या समन्वयक, मानसशास्त्रीय समुपदेशक मनीषा बिक्कड व प्रमुख पाहुणे जयश्री काळे, कुसुम सानप, लोहार राणीताई, रोहिणी कवडे ,जयश्री पोकळे, स्वाती कांबळे तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षा स्वाती सानप होत्या. कार्यक्रमात सायकॉलॉजिकल समुपदेशक मनीषा बिक्कड यांनी मेंदू कशाप्रकारे कार्य करतो यावर सविस्तर असे मार्गदर्शन केले व ताण तणाव आल्यानंतर काय उपाययोजना केल्या पाहिजेत याचे सोप्या भाषेत उदाहरण देऊन मार्गदर्शन केले व अभ्यासाचे नियोजन कसे केले पाहिजे याचीही माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. कार्यक्रमात विविध क्षेत्रातील गुणवंत महिला लोहार राणीताई, रोहिणी कवडे, जयश्री पोकळे ,स्वाती कांबळे, छायाताई माहोळकर, काजल सानप , जयश्री काळे , कैवल्य वनवे , ज्योती पवळ, जयश्री पोकळे संगीत खुर्ची मध्ये महिला गटातून प्रथम आलेल्या जयश्री काळे ,छाया मोहोळकर व मुलींच्या गटातून प्रथम आलेली कर्तव्या वनवे यांचा मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.संजय तांदळे व बाजीराव ढाकणे व मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते सरस्वतीच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. त्यानंतर स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रारंभी विद्यार्थी आदर्श बांगर ,प्रवीण गोरे ,अविष्कार गुजर ,सुरज खांडे यांनी आई विषयी आपले मनोगत व्यक्त केले .कार्यक्रमाचे प्रस्ताविक ज्ञानसागर गुरुकुलच्या संचालिका स्वाती सानप यांनी केले तर सूत्रसंचालन गणेश सानप तर आभार डॉ. संजय तांदळे यांनी मानले.



# जिल्हा परिषदचे जगदीश मिनियार नवीन मुख्य कार्यकारी अधिकारी

**जालना । प्रतिनिधी**

**जालना जिल्हा परिषदेच्या वर्षा मिना त्यांचा कालावधी पूर्ण झाल्यामुळे ह्या अचानक रजेवर गेल्या त्यांना माहीत होतं शासनाच्या नियमाप्रमाणे माझा कालावधी पूर्ण झाला परंतु या अचानक रजेवर गेल्यामुळे कोणाच्याच लक्षात आले नाही. बदलीच्या अगोदर जाणे म्हणजे दिशाभूल आहे असे पण बोलल्या जात आहे. रजेवर जायचं होतं तर माझी बदली होणार आहे. असे त्यांनी सांगणे गरजेचे होतं. असे पण बोलल्या जात आहे. शेवटची भेट पत्रकारांची घेतल्यामुळे हा प्रकार सगळा लक्षात आला. परंतु हा सगळा विषय कोण जाणार कोण येणार हे फक्त त्यांनाच माहीत होतं असे पण बोलल्या जात आहे.**

मुख्य कार्यकारी अधिकारी रजेवर गेल्याने त्यांच्या रिक्त जागेवर छत्रपती संभाजीनगर स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश गोपीकिशन मिनियार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते सोमवारी (ता. १०) रोजी पद्भार घेणार असल्याचे जिल्हा परिषद प्रशासन मध्ये बोलल्या जात आहे. राज्याच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांनी श्री. मिनियार यांच्या नियुक्तीचे आदेश निर्गमित केले आहेत. श्रीमती वर्षा मिना ह्या प्रदिर्घ रजेवर गेल्याने त्यांच्या जागी आपली नियुक्ती करण्यात येत असून, आपण सध्याच्या पदाचा कार्यभार नगर विकास विभागाचे प्रधान सचिव यांच्या सल्ल्याने अन्य अधिकाऱ्याकडे सोपवुन नवीन अर्थात जालना जिल्हा परिषदेचा कार्यभार त्वरीत स्विकारावा, असे व्ही. राधा यांनी श्री. मिनियार यांना दिलेल्या नियुक्तीपत्रात म्हटले आहे. जगदीश मिनियार यांनी यापुर्वी जालन्यात सेवा बजावलेली असून, शिस्तीत काम करणारे अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे . आता त्यांना जालना जिल्हा परिषद अर्थात मिनी मंत्रालयाचा ढेपाळलेला कारभार सुधारण्याकडे लक्ष द्यावे लागणार आहे. श्री. मिनियार यांची महसूल विभागातील सेवेची सुरुवात सन १९९१ मध्ये तहसिलदार पदापासून झाली. परिविक्षा कालावधीनंतर त्यांनी कळंब (जि. धाराशिव) आणि अहमदपूर (जि. लातूर) येथे तहसिलदार म्हणून काम पाहिले. त्यानंतर पदोन्नतीने उपजिल्हाधिकारी रोहयो (परभणी), उपविभागीय अधिकारी हिंगोली, निवासी उपजिल्हाधिकारी हिंगोली, निवासी उपजिल्हाधिकारी जालना, उपजिल्हा निवडणूक अधिकारी नांदेड, उपजिल्हाधिकारी रोहयो नांदेड, उपविभागीय अधिकारी नांदेड, त्यानंतर सहाय्यक आयुक्त (नरेगा) नागपुर येथे लागणार काम पाहिले. या सर्व पदावर कार्यरत असतांना श्री. मिनियार यांनी कर्तव्यदक्षपणा व शिस्तबध्द कारभार करीत जनसामान्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर पदोन्नतीने अपर जिल्हाधिकारी झाल्यानंतर काही काळ पुणे येथे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, त्यानंतर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ अंतर्गत समृध्दी महामार्गाकरिता समन्वयक तसेच अपर जिल्हाधिकारी हिंगोली या पदावर त्यांनी उल्लेखनीय काम केले. त्यानंतर पदोन्नतीने सामान्य प्रशासन विभागाचे उपायुक्त म्हणून छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत असतांना ऑक्टोबर २०२४ मध्ये नागरी सेवेतील अधिकारी म्हणून त्यांची भारतीय प्रशासन सेवेत पदोन्नती झाली होती. श्री. मिनियार यांनी आपल्या ३४ वर्षाच्या कार्यकाळात विविध ठिकाणी, विविध प्रकारची कामे पार पाडली. नांदेड येथील गुरुतागदी कार्यक्रमात त्यांचा महत्वाचा सहभाग होता. आता ते कोणत्या पद्धतीने न्याया द्यायचं काम जिल्हा परिषद प्रशासन मध्ये करणार आहे हे आता बघणे समोर आहे.

# महाबोधी महाविहार कायदा १९४९ रद्द करा

## प्रकाश आंबेडकर यांची मागणी; बुधवारी राज्यव्यापी आंदोलन

**मुंबई । प्रतिनिधी**

**बोधगया येथील महाबोधी महाविहाराचे नियंत्रण बौद्ध समाजाकडे देण्यात यावे, या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीने आवाज उठवला आहे. बौद्ध धम्माच्या पवित्र जागेवर अद्यापही बौद्ध समाजाचे संपूर्ण नियंत्रण नसणे, हा अन्याय आहे. महाबोधी महाविहार कायदा, १९४९ रद्द करण्यात यावा, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केली.**



प्रकाश आंबेडकर यांनी ट्विट करत म्हणाले की, महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी, तसेच महाबोधी महाविहार कायदा १९४९ रद्द करण्याच्या मागणीसाठी बुधवारी (दि.१२) राज्यव्यापी आंदोलनाचे आयोजन वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात येणार असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी या कायद्याविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करत, बौद्ध समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याचे आणि या आंदोलनात बौद्ध समाज आणि सर्व न्यायप्रिय नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीने केले आहे.

# जिल्ह्यात जलजीवन योजनेचे अडीचशे कोटी रुपये अडकले

## टक्केवारीचे दिलेले पैसे अडकल्याची चर्चा-ॲड.अजित देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

**लाडकी बहीण योजना राबवून सरकार परत आणण्याचा प्रयत्न झाला. हा प्रयत्न यशस्वी देखील झाला. मात्र विकास कामे मोठ्या प्रमाणात खोळंबली गेली आहेत. त्यामुळे या योजनेच्या नादात सरकार आणून शासनाने जनतेची फसवणूक केल्याचे स्पष्ट दिसते. बीड जिल्ह्यात केवळ जलजीवन योजनेचे जवळपास अडीचशे कोटी रुपये अडकले असून अनेक सुशिक्षित बेकार अभियंते आणि कंत्राटदार व्याज भरत-भरत परेशान आहेत. त्यामुळे ही एक प्रकारची फसवणूक असल्याचा आरोप जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी केला आहे.**

राज्य शासनाने लाडकी बहीण योजना निवडणुका जवळ आल्यानंतर राबवली. योजना राबवणे हा सरकारचा अधिकार आहे. मात्र योजनेच्या माध्यमातून सरकार आणून जनतेची फसवणूक करणे, हा अधिकार शासनाला नाही. या योजनेच्या नादात एका-एका महिलेने पंचवीस पंचवीस वेळेला लाभ घेतल्याचे निष्पन्न झाले असले, तरी त्यावर कारवाई होत नाही. पुढील निवडणुकीकडे सरकारचा डोळा आहे. योजना राबवण्याचा नादात निकष पाहिले नाहीत. आता दिलेले लाभही कमी होत आहेत. जिल्ह्यातील विकास कामे पूर्णपणे खुळंबली गेली आहेत. तर दुसरीकडे अनेकांनी अनेक कामात दिलेली टक्केवारी अडकून पडल्याने अनेक जण परेशान असल्याची चर्चा जनतेत आहे. सामान्य लोक यात भरडले गेले आहेत. तरी देखील पुढाऱ्यांना याचे देणे घेणे नाही. आठ आठ महिन्यापासून अनेक ठिकाणी जलजिवनची कामे अडकून पडलेली आहेत. त्यांना बिल दिले जात नसल्याच्या तक्रारी होत आहेत. सोलापूर जिल्ह्यात एका कॉन्ट्रॅक्टरने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. अशा बाबी गंभीर आहेत. जलजिवनची अनेक कामे थोड्या प्रमाणात चालू आहेत. मात्र यात गुत्तेदारांचा पैसा अडकून पडला आहे. गुत्तेदारांची कामे कशा पद्धतीने आहेत, हा मुद्दा वेगळा आहे. मात्र अशा प्रकारे त्यांची पिळवणूक करणे, हे कुठल्याही शासन नियमात बसत नाही. त्यामुळे गुत्तेदारांनी देखील शासनाच्या विरोधात पाऊल उचलायला हवे. मात्र तसे होत नाही. एकट्या जलजिवन योजनेचे असे झाले आहे, असे नाही. तर सर्वच विकास कामांना खिळ बसलेली आहे. त्यामुळे नवे सरकार आल्यापासून निधी नसल्याचा बहाणा सांगत विकास कामे खोळंबली आहेत. सामान्य जनतेची यात फसवणूक झालेली आहे. त्यामुळे जनतेने जागे होणे आवश्यक आहे, असेही ॲड. अजित देशमुख यांनी म्हटले आहे.

# अवैध दारू, कारसह अडीच लाखाचा मुद्देमाल जप्त

**जालना । प्रतिनिधी**

**अवैधरित्या विक्रीसाठी देशी दारू घेऊन जाणारी कार पोलिसांनी पकडली आहे. कदिम जालना पोलिसांनी ही कारवाई केली. ५७ हजाराच्या देशी दारुसह अडीच लाखाचा मुद्देमाल पोलिसांनी या कारवाईत जप्त केला. जालना शहरातील कैकाडी मोहल्ल्यात ही कारवाई करण्यात आली. जुना जालना भागातील एका देशी दारूच्या दुकानातून देशी दारूचा मोठा साठा कारमध्ये भरून तो अवैधरित्या विक्रीसाठी नेण्यात येत असल्याची माहिती कदीम जालना पोलिसांना मिळाली होती. त्या माहितीवरून पोलीस पथकाने जुन्या जालन्यातील कैकाडी मोहल्ल्याकडे जाणार्या रोडवर सापळा रचून ही कार पकडली. यावेळी पोलिसांना पाहून करचालक कार सोडून पसार झाला. किशोर भगवान जाधव वय ३५ वर्षे रा. कैकाडी मोहल्ला जुना जालना असे फरार झालेल्या आरोपीचे नाव आहे. यावेळी पोलिसांनी कारची झडती घेतली असता, कारमध्ये ५७ हजार रुपये किंमतीच्या देशी दारूच्या ५५० बाटल्या आढळून आल्या आहेत. पोलिसांनी २ लाखाची कार आणि देशी दारूचा साठा, असा २ लाख ५७ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**

कदीम जालना पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक ज्ञानवेद आंनदा नागरे यांच्या फिर्यादीवरून कदीम जालना पोलीस ठाण्यात कलम ६५ (इ) मुंबई दारुबंदी कायद्या प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिकचा तपास सुरू आहे. सदरील कारवाई पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी आनंत कुलकर्णी, यांच्या मार्गदर्शनाखाली कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सिद्धार्थ माने, उपनिरीक्षक ज्ञानदेव नागरे, हेड. कॉन्स्टेबल सदा राठोड,महिला पोलीस कान्स्टेबल रेखा, म.पो.का.नाईक, पो.ना. बाबा गायकवाड, संदिप चव्हाण, अशपाक शहा,दिलीप गायकवाड,चालक वंजारे आदिंनी केली आहे.

# अंबडमध्ये भाजीमंडीत फिर्यादीने मोबाईल चोर पकडला

अंबड । प्रतिनिधी

अंबड शहरांमध्ये न्यायालय व उपविभागीय पोलीस अधिकारी या रोडवरील रविवारी मोठ्या प्रमाणात भाजी मंडी भरती रविवारी शासकीय सुट्टी असल्यामुळे शिक्षक व अधिकारी कर्मचारी तसेच पोलीस कर्मचारी यांचा भाजी मंडी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी असतो. परंतु या भाजीमंडीत वारंवार मोबाईल चोरी होतात . तसेच या भाजीमंडीत अनेकांचे मोबाईल चोरी गेलेली आहे परंतु अद्याप पर्यंत मोबाईलचा तपास लागला नाही अशीच घटना आज शामसुंदर श्रीमंतराव शिंदे रा. स्वामी समर्थ नगर अंबड यांचा मोबाईल चोरी करताना रंग हात पकडून व पोलीस ठाणे अंबड येथे आरोपीला आरोपीला देण्यात आला. परंतु सदरील आरोपीची या प्रकरणी पोलिसांनी चौकशी करणे गरजेचे आहे चौकशी केल्यास मोबाईल चोरीचे मोठे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. तसेच रामकिसन घुगे याचा पण मोबाईल आज भाजी मंडी मधून मोबाईल चोरीला गेला तसेच या अगोदर सुद्धा रामकिसन घुगे यांचा मोबाईल चोरी गेलेला आहे. याप्रकरणी शामसुंदर शिंदे यांच्या आज दिनांक ०९/०३/२०२५ रोजी सकाळी साडे आठ वाजेच्या सुमारास मी आठवडी बाजार असल्याने बाजार करण्यासाठी कोर्ट रोड अंबड येथे गेलो व बाजार करत असतांना एका इसमाने माझा शर्टच्या खिशातील मोबाईल काढतांना मी त्यास पकडले त्यानंतर मी व आजूबाजूच्या लोकांनी रागाच्या भरात त्यास धक्काबुक्की केली व तेथील बाजार बंदोबस्त चे पोलीस व होमगार्ड च्या ताब्यात दिले त्यानंतर पोलीसांनी त्याला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने नाव गाथ अजय कचरू कूपककर थप २५ वर्षे रा. राजूनगर ता जि बीड असे सांगितले तरी माझ्या मोबईलचे वर्णन खालील प्रमाणे गेला माल ४,५०० /रू किमतीचा सॅमसंग मोबाईल वापरता कि अंदाजे एकून ४,५०० रू जू था कि अं तरी टि ०९/०३/२०२५ रोजी सकाळी साडेआठ वाजेच्या सुमारस भी आठवडी बाजार येथे बाजार करीत असताना सदरील व्यक्तीने अजय कचरू कृपवार वय २५ वर्षे रा. राजूनगर ता जि बीड याने माझ्या शर्टच्या खिशातील मोबाईल चोरी करण्याचा प्रयत्न करतांना बघितले आहे. तरी त्याच्यावर योग्य ती कायदेशिर कार्यावाही करावे व सदरील पोलिसांच्या ताब्यात दिलेल्या व्यक्तीची सखोल चौकशी करून कारवाई करावी व ज्याचे मोबाईल चोरी झाले त्यांचे गुन्हे उघडकीस येऊ शकतात असे फिर्यादीचे म्हणणं आहे.



## पान १ वरून...

### आज सादर होणार

त्यांनी सादर केला आहे. मागील वर्षीचा निवडणूकपूर्व अर्थसंकल्प सर्वसमावेशक, क्रांतीकारी अर्थसंकल्प होता. महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेवर आणण्यात त्या अर्थसंकल्पातील लोकोपयोगी, लोकप्रिय निर्णयांचा महत्वाचा वाटा होता. आता सोमवारी सादर होणाऱ्या अर्थसंकल्पाकडून राज्यातील जनतेला अनेक अपेक्षा असून, अजित पवार त्या अपेक्षांवर खरे उतरतील का याकडे लक्ष लागले आहे.

---------

### कर्जमाफी ते दिवसा

येथे धरणे आंदोलनाने होणार आहे. यासाठी राज्यभरातील शेतकऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन शेतकरी संघटनेचे नेते रघुनाथ पाटील यांनी केले आहे.

-----------

### खोक्या भाईचे वनविभागाच्या

वनविभागाला त्याचा एवढा पुळका का? प्रश्न नागरिक विचारत आहेत. खोक्या भोसले आणि त्याचे नातेवाईक राहत असलेली जागा वनविभागाची असून संदर्भात कार्यवाही केली जाणार जाईल, अशी माहिती शिरूरचे पोलिस निरीक्षक गणेश धोक्रड यांनी दिली आहे.

------------

### अजितदादा, तुमच्या आमदारामुळे राज्य

विनंती करते की या आधीही अनेक प्रकरणे घडली आहेत. त्याची सुद्धा सखोल तपासणी करा. अजितदादा हे असे व्यक्तिमत्व आहे की ते खऱ्याचे खरे करतात, खोट्याचे खोटें करतात. या प्रकरणात सुद्धा त्यांनी लवकरात लवकर न्याय मिळवून द्यावा असे वैभवी देशमुख म्हणाली. ज्या खंडणीसाठी माझ्या वडिलांचा जीव गेला ती खंडणी नेमकी कुणाला जात होती? त्यामध्ये माझ्या वडिलांचा गुन्हा काय होता? सरकारचे डोळे कधी उघडणार? हे सवाल वैभवीने उपस्थित केले. वैभवी देशमुख म्हणाली की, एका दलित व्यक्तीला वाचवायला गेले तरी माझ्या वडिलांना अमानुष मारहाण झाली. एखाद्याला मदत करणे गुन्हा आहे का? मला माझ्या वडिलांचा चेहरा बघायचा होता. मला चेहरा बघायला मिळाला नाही. इथून पुढे कधी चेहरा बघायला मिळणार नाही. बीड जिल्ह्यातील ही घाण आम्हाला उचलून टाकायची आहे. आता आम्हाला जर न्याय मिळाला नाही तर रस्त्याने चालताना धक्का लागला तरी हे आम्हाला जीवे मारतील. त्यामुळे न्याय मिळाला पाहिजे. प्रशासनाने आम्हाला न्याय द्यावा हीच विनंती असल्याचे ती म्हणाली. संतोष देशमुखांच्या हत्येसंदर्भातले सर्व लेखी पुरावे असून ते लवकरच मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना देणार असल्याचे संतोष देशमुखांचे भाऊ धनंजय देशमुखांनी जाहीर केले.

------------

### माझ्या जन्मदात्या आईबद्दल काही

नसावेत म्हणून काहीजण माझ्या कुटुंबावर सुध्दा असे खोटारडे आरोप करून घृणास्पद राजकारण साधत आहेत, हे उद्विग्न करणारे आहे, असे मुंडे म्हणाले. राजकीय आणि सामाजिक जीवनात अलीकडच्या काळात माझ्यावर या प्रकारचे खोटे आरोप आणि ड्रामा स्क्रिप्ट रचण्यात आल्या. माझ्या आजार आणि आरोग्यावर व्यंग आणि निंदा केली गेली, शंका निर्माण केल्या गेल्या, तेही सगळे मी सहन केले. मात्र माझ्या जन्मदात्या आईवर असे खोटे आरोप करण्याची हिम्मत कुणी करत असेल तर हे स्वीकारणे आणि गप्प राहणे अशक्य आहे. राजकारण आता या स्तरावर गेले याचे वाईट वाटत आहे असे ट्विट धनंजय मुंडे यांनी केले आहे.

------------

### आजपासून संसद अधिवेशनाचा

ठिणगी, अमेरिकेच्या आयात शुल्क धोरणाचा परिणाम आदी मुद्दे उपस्थित करण्याची विरोधकांची योजना आहे. काँग्रेसने इंडिया आघाडीतील इतर घटक पक्षांना साथीला घेऊन महत्वाचे मुद्दे मांडण्याची ग्वाही दिली आहे. द्रमुकने लोकसभा मतदारसंघ फेररचनेवरून आक्रमक पवित्रा स्वीकारला आहे. तर, तृणमूल काँग्रेसने डुप्लिकेट मतदार ओळखपत्र क्रमांकांचा मुद्दा लावून धरण्याचे सूतोवाच केले आहे. मणिपूरमध्ये याआधीच राष्ट्रपती राजवट लागू झाली आहे. त्याविषयीच्या घोषणेला संसदेची मंजुरी मिळवण्याच्या उद्देशातून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा वैधानिक ठराव मांडणार असल्याचे समजते. त्याशिवाय, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याकडून मणिपूरसाठीचा अर्थसंकल्प सादर केला जाईल. अधिवेशन ४ एप्रिलला समाप्त होईल.

----------

### जीएसटी दर कमी करणार-अर्थमंत्री सीतारामण

निर्मला सीतारमण यांनी शनिवारी घोषणा केली की, वस्तू आणि सेवा कर अर्थात जीएसटी दर आणखी कमी केले जातील, कर दर आणि स्लॅबचे तर्कसंगतीकरण करण्याची प्रक्रिया पूर्णत्वाकडे येत असल्याचे त्यांनी सांगितले.

-----------

### भाजपा हिंदुत्त्ववादी पक्ष

निषेध करतो आहे. मुंबई ही त्यांच्या बापाची नाही, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. देवेंद्र फडणवीस म्हणाले कामांना स्थगिती द्यायला मी काही उद्धव ठाकरे नाही, मुळात ते उद्धव ठाकरे होऊ शकत नाही, ठामपणे कामाला स्थगिती देण्यासाठी उद्धव ठाकरे हवा, त्यांना ते जमणार नाही. मी आरे कारशेड स्थगिती दिली हे खरे आहे. पण तेच कारशेड धारावीत करून दाखवले असते. देवेंद्र फडणवीसांमध्ये हिंमत असेल तर त्यांनी शेतकऱ्यांची कर्ज मुक्ती जाहीर करून दाखवावी किंवा लाडक्या बहिणांना २१०० रुपये जाहीर करून दाखावावे, असे आव्हानही उद्धव ठाकरे यांनी दिले. भाजपाचे लोक भाषावाद करत आहेत, मराठी माणूसच मराठी माणसाचा घात करतो आहे. कधीतरी आपण आपली प्रवृत्ती सोडून पुढे जाणार की नाही. शिवसेना प्रमुखांनी सांगितले होते महाराष्ट्रात मी मराठी आहे देशात मी हिंदू आहे, ही आमची व्याख्या आहे, आज तुम्ही महाराष्ट्र नासवून टाकत आहात, आम्हाला भाजप मुक्त राम पाहिजे, असेही ते म्हणाले.

------------

### घरकुल योजनेत कसलाही

तसेच जे लाभार्थी पात्र आहेत त्यांचे हप्ते तातडीने वितरीत करा अशाप्रकारचे कडक निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड व शिरूर कासार तालुक्याचे गटविकास अधिकारी, बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी तसेच इतर संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

-----------

cmyk

## जागतिक महिला दिनानिमित्ताने जिल्हास्तरीय प्रदर्शन –विक्री

**बीड । प्रतिनिधी**

महिला व बाल विकास विभाग अंतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) च्या सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिन व जागतिक महिला दिनानिमित्ताने नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पाच्या अमलबजावणीसाठी दि. १० ते १२ मार्च २०२५ दरम्यान छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण, बीड या ठिकाणी स्वयंसहाय्य महिला बचतगट उत्पादित वस्तू/मालाचे जिल्हास्तरीय प्रदर्शन व विक्री करिता ''नवतेजस्विनी महोत्सव २०२५'' चे आयोजन करण्यात आले आहे.

या प्रदर्शनाचे उद्या दिनांक दहा मार्च रोजी उद्घाटन जिल्हाधिकारी अविनाश पाठक (भा.प्र.से.) यांच्या हस्ते होणार आहे यावेळी प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा पोलिस अधिक्षक नवनीत काँवत (भा.पो.से.) व मुख्य कार्यकारी अधिकारी शआदित्य जीवने (भा.प्र.से.) हे उपस्थित असणार आहेत. याकरिता जिल्ह्यातील विविध प्रकारचे ५० स्टॉल राहणार चा सहभाग असणार आहे. या नवतेजस्विनी महोत्सवामध्ये गावरान धान्य, कडधान्य, स्वादिष्ट मसाले, रुचकर पापड, कुरडई , शेवय्या, लोणचे, व विविध पदार्थ, गावरान तूप, अंडी, कापडी पिशवी,कापूस वेचणी कोट, रेडीमेड ब्लाउज, इमिटेशन ज्वेलरी, दही धपाटे, व्हेज नॉनव्हेज खानावळ इत्यादी प्रकारचे स्टॉल बीडकरांसाठी ठेवण्यात आले आहेत. तरी या नवतेजस्विनी महोत्सव मध्ये सर्व नागरिकांनी आपल्या कुटुंबासह येऊन महिला सक्षमीकरणासाठी सहकार्य करावे, असे आवाहन महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) जिल्हा कार्यालय बीड चे जिल्हा समन्वय अधिकारी चिंचोलीकर यांनी केले आहे.



# पतंजली प्रकल्प संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी वरदान ठरेल – मुख्यमंत्री

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते 'पतंजली फुड व हर्बल पार्क'चे

**नागपूर । प्रतिनिधी**

**पतंजली फुड व हर्बल पार्कच्या माध्यमातून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या मालावर प्रक्रिया करून तो बाजारपेठेत जाणार आहे. संत्र्याची ग्रेडींग, साठवणही येथे होणार असून हा प्रकल्प संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार असल्याचे प्रतिपादन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले. या प्रकल्पास राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करणार असून पतंजली व राज्यशासन संयुक्तपणे सर्व सोयींनी सज्ज नर्सरी येथे उभारणार असल्याचेही त्यांनी सांगितले.**

येथील मिहान परिसरात स्थित पतंजली फुड आणि हर्बल पार्कचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले. यावेळी मुख्यमंत्री श्री.फडणवीस बोलत होते. योगगुरु स्वामी रामदेव बाबा, पतंजली आयुर्वेद लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आचार्य बाळकृष्ण, कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जलस्वाल, आमदार सर्वश्री डॉ. आशिष देशमुख, समीर मेघे आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, ९ वर्षांपूर्वी मिहानमध्ये पतंजलीने पाया रचला. त्यानंतर बऱ्याच अडचणी आल्या तरीही





### या प्रकल्पास राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करेल; पतंजली व राज्य शासन या प्रकल्पात आधुनिक नर्सरी उभारेल

नडगमगता त्यांनी हा प्रकल्प पुर्णत्वास नेला. पतंजली उद्योग समुहाला नागपुरात मिहानमध्ये आमंत्रित केले त्याचवेळी विविध राज्यातून या समुहाला त्या–त्या राज्यांमध्ये उद्योग उभारण्यास बोलावण्यात येऊ लागले. मात्र मिहानमध्येच हा प्रकल्प उभारण्याचा संकल्प घेऊन व राज्यशासनाच्या रितसर निविदा प्रक्रियेचा अवलंब करुन आज हा प्रकल्प उभा राहिला. या प्रकल्पासाठी आवश्यक माल संत्रा उत्पादक शेतकऱ्यांकडून पुरविला जाईल. यामुळे शेतकऱ्यांचा मालही विकला जाईल. या प्रकल्पात संत्र्यावर प्रक्रिया केली जाईल. तसेच संत्रा साठवणुकीसाठी अत्याधुनिक शीतगृहेही येथे उपलब्ध आहेत. याचा फायदाही शेतकऱ्यांना होणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच या प्रकल्पासाठी राज्य शासनाच्यावतीने सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल. याठिकाणी संत्र्यासाठी आवश्यक असणाऱ्या दर्जेदार कलमा तयार करण्याकरिता पतंजली आणि राज्यशासन संयुक्तपणे सर्व सुविधांनी युक्त आधुनिक नर्सरी उभारेल, असेही त्यांनी सांगितले.

पतंजली प्रकल्पामुळे रोजगार व संत्र्याला बाजारपेठ– केंद्रीय मंत्री नितीन गडकरी पतंजलीच्या मिहान स्थित फुड आणि हर्बल प्रकल्पासाठी दिवसाला जवळपास ८०० टन संत्र्यांची आवश्यकता लागणार आहे. त्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या मालाला आपसुकच बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. तसेच या प्रकल्पामुळे स्थानिकांना रोजगारही उपलब्ध होणार असल्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यावेळी म्हणाले. या प्रकल्पास शेतकऱ्याचे पूर्ण सहकार्य लाभेल व निंबुवर्गीय फळांचा पुरवठाही करण्यात येईल. या प्रकल्पाद्वारे शेतकरी समृद्ध होण्यास मदत होईल, असेही त्यांनी सांगितले. उत्तम संत्रा बीज आणि कलम निर्मितीसाठी आधुनिक नर्सरी उभारण्याची मागणी त्यांनी यावेळी राज्य शासनाकडे केली. तत्पूर्वी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते पतंजली फुड आणि हर्बल पार्कच्या कौनशिलेचे अनावरण आणि प्रकल्पाचे विधीवत उद्घाटन झाले.

पान ६ वरून...

### अंजली रेवडकर आदर्श

खेळाडू राष्ट्रीय पातळीवर आणि अनेक खेळाडू विभागीय आणि राज्यस्तरावर चमकले . मागील वर्षात शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ३८ खेळाडूंना खेळाचे अतिरिक्त गुणांचा फायदा झाला तर यंदाच्या वर्षात ६८ प्रस्ताव तयार करण्यात आले आहेत . अंजली रेवडकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मार्गदर्शन केलेल्या समुह नृत्यांने प्रजासत्ताक दिनी प्रथम पारितोषिक पटकावले . बाल झुंबड स्पर्धेतही प्रथम क्रमांक मिळविला . योगासने , बुद्धीबळ , थ्रोबॉल , फुटबॉल , बॉल बॅडमिंटन , शटल बॅडमिंटन,मैदानी क्रीडा स्पर्धेतही घवघवीत यश मिळविले . महिला आत्मभान शिबीरात शेकडो मुलींना मार्गदर्शन केले . गणित विषयाचेही अध्यापन केले . इनरव्हील क्लबच्या माध्यमातून सामाजिक कार्यही केले त्यांना पुरस्कार मिळाल्या बद्दल संस्थाचालक आणि शाळेतील पदाधिकारी व शिक्षकांनी अभिनंदन केले.

### बाजारात टरबुजांची आवक

टरबुजाला असते त्यामुळेच टरबुज विक्री शहर व परिसरात मोठया प्रमाणात असते टरबुजाचे दर हे त्यांच्या आकारावरून ठरवले जात आहेत.काही दुकानावर ठिकाणी किलोच्या दराने टरबुज विकले जात आहेत. परंतु त्यासाठी गिऱ्हाईक अत्यल्प असल्याचे दिसून येते नगा प्रमाणेच खरेदी करण्याची ग्राहकाची तयारीअसल्याने छोटया आकारा पासून ते मोठ्या आकारापर्यंतचे टरबुजास विशेष मागणी असल्याचे दिसत आहे ग्रामीण भागाहून टरबुज वाहनामध्ये आणून शहरात विकले जात आहेत. अगदी पाच रुपयापासून होतो. परिणामी शंभर रुपयांपर्यंतचे विकले जात आहेत.

छोटे शेतकरी दुचाकी,तीन चाकी वाहनांमधुन टरबुज विक्रीसाठी बाजारात विक्रीसाठी आणत आहेत. तर मोठे शेतकरी आणि मोठ्या वाहना मधुन टरबुजाची मोठ्या प्रमाणात आवक करीत आहेत साधारणपणे शहरात मंगळवार,शुक्रवार, रविवार या दिवशी भरणाऱ्या आठवडी बाजारातून टरबुजांची मोठी विक्री होत असल्याने तसंच मंडीबाजार,गुरूवार पेठ, शिवाजी महाराज चौक,स्वा.सावरकर चौक,अण्णाभाऊ साठे चौक सह इतरत्र टरबुजाची आवक मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे.

### ब्राह्मण समाज सभागृहाकरीता

सभागृह उभारण्यासाठी निधीची कमी पडू देणार नाही अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. यावेळी आशीर्वाचन पर मार्गदर्शन करताना आदीलाबाद येथील रामकृष्ण मठ संस्थानचे मठाधिपती योगानंद सरस्वती स्वामी म्हणाले की ब्राह्मण समाजाने दिशा देण्याचे काम आजपर्यंत केलेले आहे,असे असले तरी देखील गायत्री मंत्राची उपासनना करण्याची गरज आहे.सामुदायिक उपनयन संस्कार कार्यक्रमात एकोणवीस बटुंवर उपनयन संस्कार करण्यात आले हा निश्चितच स्तुत्य व कौतुकास्पद उपक्रम असल्याचे देखील स्वामी यांनी सांगितले. प्रास्ताविकात बोलताना उपनयन संस्कार समितीचे अध्यक्ष डॉक्टर सचिन देशमुख म्हणाले की माजलगाव सारख्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर ब्राह्मण समाज संघटन करण्यात आलेले आहे सातत्याने सामुदायिक उपनयन संस्कार करून समाजाला दिलासा देण्याचे काम केले जाते हे करत असताना सर्व समाजाचे पाठबळ मिळत असल्यामुळेच हे शक्य होत असल्याचे त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन हिमांशू देशमुख,लता जोशी डॉ.प्रज्ञा जोशी,नंदकुमार कुलकर्णी,यांनी केले तर दत्ता महाजन यांनी आभार मानले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपनयन संस्कार समितीचे अध्यक्ष डॉ,सचिन देशमुख, अनंत शास्त्री जोशी,राजू पाठक,विनायक रत्नपारखी, बप्पासाहेब देशमुख दामोदर संधी कर अशोक कान्नापूरकर, चंद्रकांत देशमुख, मुकुंद जोशी व समस्त ब्राह्मण समाज बांधवांनी पुढाकार घेतला.

### परिषदेच्या वतीने उत्कृष्ट

जबाबदारी पार पडली.

ग्राम पंचायत स्तरावर पाणी, स्वच्छता व आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्रामसभेचे आयोजन करून पाणी, स्वच्छता व आरोग्य संबंधित कार्यक्रमाच्या अंमलबजावणी दरम्यान सद्यस्थितीत येणाऱ्या अडी अडचणी बाबत चर्चा करून घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाची कामे ३१ मार्च अगोदर पूर्ण करण्यासाठी नियोजन करण्यात आले. जिल्ह्यात किमान एक महिला अनुकूल आदर्श ग्रामपंचायती संबंधित मॉडेलची उभारणी करण्याबाबत नियोजन करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांच्या रंगनाथ हा कार्यक्रम व्हावा व त्यासाठी सर्वांना एकत्रित करण्याबाबत शाळेच्या मुख्याध्यापकांनी पुढाकार घेतला. पाणी, स्वच्छता व आरोग्य यासंबंधी प्रत्येक ग्रामपंचायत मध्ये कचरा व्यवस्थापनाबाबत माहिती देण्यात आली. कुजनारा व नकुजणाऱ्या कचऱ्याबाबत प्रत्येक घरातून सुरुवात झाली पाहिजे याबाबत जनजागृती करण्यात आली.

जिल्हा परिषद व इतर शाळांमधून मासिक पाळी स्वच्छता

पान ६ वरून...

व्यवस्थापन बाबत चर्चा व प्रत्येक विद्यार्थ्याला शाळेमध्ये पॅड उपलब्ध करून देण्याबाबत नियोजन करून देण्यात आलेले आहेत त्यासाठी ग्रामपंचायतींनी जबाबदारी घेतली आहे. तसेच एफटीके किट चाचणी करण्याबाबत शाळेतील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले शिवाय मिळणारे पाणी शुद्ध आहे का हे पाहण्यासाठी शाळेतच सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. आता मुलींनी आणलेल्या बाटली मधील पाणी शाळेतीलच मुली त्यांच्याच प्रयोग शाळेत शासनाने दिलेल्या तपासणी किट द्वारे तपासणी करण्या संबंधी नाविन्यपूर्ण प्रशिक्षण सत्रे आयोजित केले.

### पाटोदा कृषी उत्पन्न बाजार

बांगर यांची होती.या बैठकीत ऐतिहासिक निर्णय घेत पाटोदा व शिरूर उत्पन्न बाजार समितीचे वेगवेगळे विभाजन करून शिरूर उत्पन्न बाजार समितीला स्वतंत्र मान्यता देणाचा एकमुखी ठराव मंजूर करण्यात आला आहे.

पाटोदा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळांची स्थापना झाल्यानंतर अनेक महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले असून त्यामध्ये प्रामुख्याने पाटोदा व शिरूर तालुक्यातील आडत व्यापाऱ्यांची वेळोवेळी बैठक घेऊन त्यांना कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातच आपले व्यवसाय सुरू करावा व लिलाव पद्धतीने शेतकरी बांधवांचा माल खरेदी करावा तरच त्यांचा परवाना नुतनीकरण करण्यात येईल तसेच त्यांना सर्व सोईसुविधा मार्केट यार्डात देण्यात आल्या आहेत व प्रमाणिक प्रयत्न करण्यात येत असुन कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अंतर्गत रस्ते असो किंवा मुख्य रस्त्याचे काम आदी सुविधा परवाना धारक व्यावसायिकांना उपलब्ध व्हावा यासाठी पाटोदा नगरपंचायत तथा जिल्हाधिकारी साहेब यांच्याकडे पाठपुरावा सुरू असून लवकरच त्यावर तोडगा काढण्यावर भर देण्यात येत आहे. या आर्थिक वर्षात १६ लाख २२ हजार रुपये मार्केट कमिटी नफ्यात असुन लोकनेत्या पंकजाताई मुंडे आणी आमदार सुरेश अण्णा धस यांच्या नेतृत्वात यशस्वी वाटचाल सुरु आहे.तसेच लवकरच शेतकऱ्यांचा शेतमाल लिलाव पद्धतीने खरेदी विक्रीचा उद्घाटन सोहळा आ.सुरेश आण्णा धस यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याने कृषी उत्पन्न बाजार समिती व शेतकऱ्यांनाही यांचा थेट लाभ होणार आहे.असे कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे यांनी माध्यम प्रतिनिधीशी संवाद साधताना केला आहे.

### सात वर्षानंतर होणाऱ्या पंचायत

प्रशासकीय मान्यता घ्यावी लागणार आहे त्याबाबतचे आदेश तीनही पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांना देण्यात आले आहेत त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी शेततळे करून घ्यावेत असे आवाहन करून आमदार सुरेश धस पुढे म्हणाले की पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत सर्व योजनेतील घरकुले मंजूर करण्यात आली असून सर्व लाभार्थ्यांना पहिला हप्ता त्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आलेला आहे मात्र आष्टी तालुक्यातील तीन आणि शिरूर (कासार) तालुक्यातील एका ग्रामपंचायत मध्ये काही लाभार्थ्यांना अडचणी निर्माण करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे ..

तथापि घरकुलाच्या यादीतील सन २०१४ नंतर प्रपत्र ड मधील दर्शवलेल्या सर्व लाभार्थ्यांना कोणताही राजकीय पक्ष अभिनिवेष ठेवता सर्व लाभार्थ्यांना घरकुले मंजूर करण्यात येणार आहेत

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत एका गावामध्ये २० पेक्षा अधिक कामे मंजूर करता येत नाहीत त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांना याबाबतचे अधिकार नसल्यामुळे त्यांच्या ऐवजी विभागीय आयुक्त यांचेकडून मंजुरी घेण्यात येईल असे त्यांनी सांगितले आगामी काळामध्ये सर्व मजुरांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या त्यांना काम उपलब्ध करून देण्यात येईल..

या आणि अशा सर्व मागण्यांबाबत आष्टी, पाटोदा आणि शिरूर (कासार) या तीनही तालुक्यातील पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या नागरिक ग्रामस्थांनी या आम सभांमध्ये जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून आपले मत मांडावे असे आवाहनही शेवटी त्यांनी केले आहे

# समाजात परिवर्तन करण्याच्या भूमिकेवर आपण ठाम असल्यास समाजही या भूमिकेचा स्वीकार करतो –तारका वानखडे

**आंबजोगाई । प्रतिनिधी**

आंतरभारती शाखा अंबाजोगाई तर्फे दिनांक ०८/०३/२०२५, शनिवार रोजी मेरी बात या उपक्रमाचा १३ वा भाग संपन्न झाला. या कार्यक्रमात उत्कृष्ट उपक्रमशील शिक्षिका, हौशी कलावंत, बुद्धिबळ खेळाडू, पक्षीमित्र व आंतरभारती शाखा अंबाजोगाईच्या कार्यकारिणी सदस्या तारका वानखडे यांनी आपला जीवन प्रवास उलगडून सांगितला. मनोगत सादर




करताना त्या म्हणाल्या की, एका नास्तिक घरात त्यांचा जन्म झाला. घरामध्ये सुरुवातीपासूनच चळवळीचं वातावरण होतं. गांधी जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वर्धेत त्यांचा जन्म आणि शिक्षण असे दोन्ही झाले. शाळेत शिकत असताना त्या उत्तम बुद्धिबळ खेळाडू होत्या. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर काही वर्ष त्यांनी सेवाग्राम येथील नयी तालीम या शाळेत काम केले. या शाळेमुळे शिक्षणाविषयीचा त्यांचा दृष्टिकोन बदलला. शाळेत स्त्री–पुरुष समानता, धर्मनिरपेक्षता, श्रमप्रतिष्ठा ही मुल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवणे फार महत्त्वाचे आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

सामाजिक बदलाच्या भूमिकेवर आपण ठाम राहिल्यास समाजही त्या भूमिकेसह आपला स्वीकार करतो. असे मत त्यांनी आपल्या मनोगतामध्ये व्यक्त केले. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, आपण जी भूमिका स्वीकारली आहे, अशाच समविचारी जोडीदाराची निवड केली. लग्नानंतर सुरुवातीच्या काळात काही वर्ष आर्थिक परिस्थितीमुळे संघर्ष करावा लागला, असेही त्या म्हणाल्या. आम्ही स्त्री–पुरुष समानतेचा पुरस्कार करणारं दांपत्य असल्यामुळे, मुलाला जात न लावण्याचा निर्णय घेतला. तसेच शाळेत नाव टाकताना आई आणि वडीलांच नाव त्याला लावल. अशा पदधतीने स्वतःचा जीवन प्रवास त्यांनी आंतरभारतीच्या मेरी बात या कार्यक्रमात मांडला. आंतरभारती परिवाराकडून खूप काही शिकण्यास मिळाले, असे मत तारका वानखडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले. हा कार्यक्रम अंबाजोगाई येथील मंगळवार पेठेतील मानवलोक च्या जनसहयोग कार्यालयात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरवातीला तारका वानखडे यांचे शरद लंगे सरांनी पुस्तक देऊन स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्यंकटेश जोशी यांनी केले. या कार्यक्रमासाठी आंतरभारतीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष अमर हबीब, महावीर भगरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# आदर्श प्रा.विद्यालय व श्री लक्ष्मेश्वर विद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

घाटनांदूर । प्रतिनिधी

येथे दि.८ मार्च २०२५ रोजी अर्थात आंतरराष्ट्रीय महिला दिन घाटनांदुर येथील आदर्श प्राथमिक विद्यालय श्री लक्ष्मेश्वर विद्यालयात भव्यदिव्य साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन कदम मॅडम, काळदाते मॅडम,माळी मॅडम, देशमाने मॅडम,मंगल वैद्य यांनी केले.कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रमाता जिजाऊ व विद्येची देवता सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली,यावेळी राष्ट्रसंत गाडगेबाबा यांचे ग्रामस्वच्छतेचे कार्य अविरतपणे राबविणाऱ्या घाटनांदूर ग्रामपंचायतच्या सर्व सफाई महिला कामगार व आरोग्य विषयक संपूर्ण सुविधा जनसामान्य माणसापर्यंत पोहोंचविणाऱ्या सर्व



आशाताई,तसेच प्रत्येक क्षेत्रामध्ये यशस्वी झालेल्या शाळेच्या माजी विद्यार्थिनी यांचा शाळेच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात अध्यक्षस्थानी श्रीमती माळी मॅडम तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.श्रीमती संगीता कुलकर्णी होत्या यावेळी विचारमंचावर उपसरपंच श्रीमती शर्मिला जाधव,शारदा गित्ते,विर मॅडम,शालुबाई गोदाम,गिरी मॅडम या उपस्थित होत्या.यावेळी डॉ. कुलकर्णी मॅडम यांनी उपस्थित महिलांना व विद्यार्थिनींना महिलांच्या आरोग्याबद्दल मार्गदर्शन केले,तर विर मॅडम यांनी आपल्या गीतातून महिलांची महती व्यक्त केली.यानंतर माता–पालकांच्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या,व या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना दुसऱ्या सत्रातील कार्यक्रमात बक्षीस देऊन गौरविण्यात आले.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती कदम मॅडम तर प्रमुख पाहुणे म्हणून अंधश्रद्धा निर्मूलन समिती मराठवाडा विभागाच्या राज्यसरचिटणिस श्रीमती रुकसाना मुल्ला मॅडम होत्या,यावेळी रुकसाना मॅडम यांनी महिलांना आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देऊन महिलांना जागतिक महिला दिनाचा इतिहास व महत्व सांगितले.यावेळी कार्यक्रमाचे अभ्यासपूर्ण प्रास्ताविक काळदाते मॅडम यांनी केले तर सुत्रसंचलन कु.ज्ञानेश्वरी नागरगोजे,श्रुती चव्हाण, कु.तेजस्विनी नागरगोजे यांनी केले,तर शाळेच्या माजी विद्यार्थिनी कु.स्मिता पुरी,कु.शुभांगी गवळी,कु.यशश्री सिरसाट यांनी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी कार्यक्रमास जवळपास १५० पेक्षा जास्त महिलांची उपस्थिती होती. या सर्व कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मु.अ.श्री सोनपिर सर, मु.अ शेटे सर,सर्व शिक्षक–शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

# पीएमश्री जि. प. मा. शाळा पाली येथे राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा

**बीड । प्रतिनिधी**

जि. प .माध्यमिक शाळा पाली येथे राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी जि. प. माध्यमिक शाळा पाली येथे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल कुतूहल निर्माण करण्यासाठी तसेच त्यांच्यातील वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवण्यासाठी दि. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य श्री विक्रम सारूक साहेब ,जिल्हा शिक्षण अधिकारी( योजना ), श्री पंचगल्ले साहेब व शिक्षण विस्तार



अधिकारी काळम साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध विषयावर वेगवेगळे वैज्ञानिक उपकरणे प्रतिकृती व प्रयोग सादर केले व त्याची माहिती विद्यार्थ्यांनी दिली. याप्रसंगी सारुक साहेब , पंचगल्ले साहेब व काळम साहेब यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी प्रशालेतील मुख्याध्यापक लाड सर सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी व शिक्षण प्रेमी नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

cmyk

# शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्यासाठी शेतकऱ्यांचे आंदोलन !

हिंगोली : पवनार-पत्रादेवी (नागपूर-गोवा) शक्तिपीठ महामार्ग कायमस्वरूपी रद्द करण्यात यावा, या मागणीसाठी बाधित शेतकऱ्यांनी वसमत परभणी राष्ट्रीय महामार्गावर रास्ता-रोको आंदोलन केले.

शक्तिपीठ महामार्गासाठी हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील गिरगाव, पळसगाव, पिप्रा चौरे, गुंज रुंज, आसेगाव, टाकळगाव, राजापूर, बाभूळगाव, रेणकापूर, लोण बुद्रुक, हयातनगर, जवळा खुर्द या गावांतील शेतकऱ्यांच्या जमिनी जात आहेत. शेतकऱ्यांचे प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे. तसेच बहुसंख्य शेतकरी हे भूमिहीन होणार आहेत. वसमत तालुक्यातील शेती ही पूर्णपणे बागायती शेती असून शासनाने आखलेल्या या व्यावसायिक प्रकल्पामुळे शेतकऱ्यांचे कधीही न भरून होणारे नुकसान होत आहे. या महामार्गाचे काम स्थगित केल्याचे आश्वासन देऊनही महामार्गासाठी भूसंपादनाचा



आढावा घेतला जात आहे. शेतकऱ्यांना बेसावध ठेवून या महामार्गाचे काम रेटण्याचा प्रयत्न निषेधार्ह आहे. त्यामुळे हा महामार्ग रद्द करण्यात यावा, या मागणीसाठी शनिवारी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.


या आंदोलनात ॲड. केतन सारंग, बाबूराव नवघरे, सुरेश पळवे, बापूराव ठोरे, सूरज मालेवार, उद्धव माखणे, भारत महाजन आदींसह परिसरातील अनेक शेतकरी आंदोलनात सहभागी झाले होते.

# शेळ्या आजारी पडल्यास त्यांना या झाडांची पाने खाऊ घाला

बहुतेक वेळा शेळ्या बाहेर चरायला गेल्यावर काही विशिष्ट झाडांचा किंवा वनस्पतीचा पाला खातात. शेळ्या आजारी पडल्या तर ते स्वतःला बरे करण्यासाठी झाडे किंवा वनस्पतींची पाने खातात. परंतु सध्या बहुतेक शेळीपालक शेळ्यांना बाहेर चरायला नेत नाही किंवा त्यांना शेळीपालन व्यवसायासाठी पुरेशी जागा सुद्धा नसते. अशा परिस्थितीत शेळ्यांना वेळोवेळी खाण्यासाठी अशा उपयुक्त झाडाची पाने द्यावीत. मोरिंगा, कडुनिंब, जामुन, बाईल आणि पेरूची पाने दिल्यास शेळ्यांना जास्त फायदा होईल. ही पाने शेळ्यांना अनेक रोगांपासून दूर ठेवतील.

हिरवा चारा हा दुभत्या जनावरांसाठी जीवनरक्षकापेक्षा कमी नाही. गाई, म्हशींबरोबरच शेळ्यांसाठीही हिरवे गवत आवश्यक असल्याचे जाणकार सांगतात. कारण त्यात अनेक औषधी औषधांचे गुणधर्म आढळतात. हे खाल्ल्यानंतर जनावरांची दूध देण्याची क्षमता वाढते. परंतु शेळ्यांसाठी गवतापेक्षा झाडांची पाने आणि वनस्पती अधिक फायदेशीर आहेत. पानांमध्ये असे घटक आणि औषधी गुणधर्म आढळतात, जे सेवन केल्याने शेळ्यांचे अनेक रोग आपोआप बरे होतात. कारण झाडांची पाने शेळ्यांसाठी औषध म्हणून काम करतात.

पानांमध्ये टॅनिनचे प्रमाण आणि प्रथिने :वास्तविक, मोरिंगा म्हणजेच शेवग्याची पाने, कडुनिंब, जामुन, आणि पेरूच्या पानांमध्ये मुबलक प्रमाणात टॅनिन सामग्री आणि प्रथिने आढळतात, जे शेळ्यांसाठी खूप उपयुक्त



आहेत. त्यांची पाने खाल्ल्याने शेळ्यांच्या पोटात जंत होत नाहीत. त्यामुळे शेळ्यांची वाढ झपाट्याने होते. त्यांचे वजनही झपाट्याने वाढते. शेळ्यांच्या पोटात जंत आल्यावर अनेक प्रकारचे आजार आपोआप उद्भवतात, असे तज्ज्ञ सांगतात. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.

शेळ्यांच्या मृत्यूचे प्रमाण कमी होते :कडुनिंब, पेरू, जामुन, मोरिंगा ही झाडे तुम्हाला सर्वत्र सहजासहजी दिसणार नाहीत. तरीही तुम्हाला काळजी करण्याची गरज नाही. सीआयआरजी अशा पानांपासून बनवलेले औषध बाजारात विकत आहे. ते खाल्ल्यानंतर फायदा होईल. त्याचबरोबर शेळीच्या करडांना कडुनिंबाची पाने खाऊ घातल्यास त्यांच्या शरीरातील रोगांशी लढण्याची शक्ती वाढते. हे खाल्ल्याने शेळीची करडे सहजासहजी आजारी पडत नाहीत. त्याचबरोबर शेळ्यांच्या मृत्यूचे प्रमाणही कमी होते. शेळीपालनात सर्वाधिक नुकसान शेळ्यांच्या मृत्यूमुळे होते, त्यामुळे त्यांची काळजी सातत्याने घेतली पाहिजे.

# अधिकच्या मिरची उत्पादनासाठी रोगांकडे द्या लक्ष

दरातील चढउतार, उत्पादन वाढ आणि औषध फवारणीसाठी वाढलेला खर्च यामुळे मिरची सध्या चर्चेचा विषय झाली आहे. हवामानातील बदलाचा मोठा परिणाम मिरची उत्पादनावर झालेला दिसून येतो. सध्या मिरचीचे उत्पादन कमी आणि खर्च जास्त यामुळे मिरचीचे उत्पादन वाढलेले असले तरी त्यातून मिळणारा फायदा मात्र कमी झालेला आहे. याचे मुख्य कारण आहे, ते मिरचीवर पडणाऱ्या फळकुजव्या आणि चुरडामुरडा या दोन रोगांचे. या दोन्ही रोगाच्या यशस्वी नियंत्रणावर मिरची उत्पादनाचे गणित अवलंबून आहे.

मिरचीवरील फळ कुजव्या : मिरची फळभाजी पिकावर फळ कुजव्या हा बुरशीजन्य रोग कोलेटोट्रायकम कॅपशीसी या बुरशीपासून होतो. प्रामुख्याने या रोगाची लक्षणे पक्व मिरचीच्या फळावर आढळून येतात. मिरचीच्या फळावर गोलाकार किंचीतसे खोलगट काळी कडा असलेले ठिपके सुरूवातीला दिसून येतात. अशा ठिपक्यांची संख्या वाढून संपूर्ण मिरची फळावर याचा प्रादुर्भाव होतो. परिणामी अशी फळे पूर्ण पक्व होण्याअगोदरच गळून पडतात. त्यामुळे उत्पादनात घट येते. विशेषत: काहीवेळा खोडावर देखील रोगाचे व्रण आढळतात. रोगाचा प्राथमिक प्रसार रोगट बियाणाद्वारे व दुय्यम प्रसार हवेद्वारे होतो. यावर प्रभावी उपाय म्हणून पेरणीपूर्वी बियाण्यास बाविस्टीन



किंवा थायरम किंवा कॅप्टॉन या बुरशीनाशकाची आडीच ते तीन ग्रॅम प्रती किलो प्रक्रिया करावी. शेतात रोगाचा प्रादुर्भाव दिसताच प्रतिबंधात्मक उपाय म्हणून झायनेब किंवा कॉपर ऑक्झिक्लोराईड २० ते २५ ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी व नंतरची फवारणी रोगाच्या तीव्रतेनुसार १२ ते १४ दिवसांनी करावी. वेळीच नियंत्रण केल्यास या रोगाचे यशस्वी नियंत्रण करणे शक्य होते.

मिरचीवरील चुरडा-मुरडा : मिरची फळभाजी पिकावर चुरडा-मुरडा (बोकड्या) हा रोग बोकड्या रोग म्हणून ओळखला जातो. हा रोग विषाणूजन्य असून, रोगामुळे पानाची टोके आणि कडा सुरूवातीस वरच्या बाजूस वाळतात. म्हणजे पाने कुरूळी होतात. नवीन येणारी पाने आकाराने लहान राहतात आणि त्यांच्या पृष्ठभागावर बारीक फुगवटे-गाठी तयार होतात. रोगट झाडाच्या पानावरील शिरा निरोगी झाडापेक्षा फुगीर-जाड होतात. झाडांची वाढ खुंटते. रोगट झाडास क्वचितच फुले लागतात. फळ धारणा कमी होते. रोगाची तीव्रता वाढल्यास झाडावरील सर्व पाने कुरूळी होऊन चुरगळल्या-मुरडल्यासारखी वाटतात. रोगाचा प्रसार पांढरी माशी व मावा या किडीद्वारे रोगट झाडावरून निरोगी झाडावर होतो. तसेच फुलकिडीच्या उपद्रवामुळे देखील रोगाचा प्रसार होऊ शकतो. यावर उपाय म्हणून रोग प्रसारक किडींचा बंदोबस्त करून रोग आटोक्यात ठेवण्यासाठी पेरणीपूर्वी दाणेदार फोरेट दहा किलो प्रती हेक्टरी जमिनीत टाकावे. पीक उगवल्यानंतर १५ दिवसांनी फॉस्फॉमिडॉन किंवा नुवाक्रॉन किंवा रोगर यापैकी एका कीटकनाशकाची आलटून पालटून फवारणी करावी. गरजेनुसार पुढील फवारण्या १५ ते २० दिवसांच्या अंतराने कराव्यात.

# भेंडी लागवडीचे तंत्रज्ञान अन् व्यवस्थापन

भारतातील सर्व उष्णकटिबंधीय, उपोष्णकटिबंधीय आणि उष्ण समशीतोष्ण प्रदेशात भेंडीची लागवड करण्यात येते. भेंडीच्या शेंगा हा अपरिपक्व खाद्यपदार्थाचा समृद्ध स्रोत आहे. जीवनसत्त्वे अ आणि ब आणि कॅल्शियम, फॉस्फरस आणि खनिजे, लोह याबरोबरच हा आयोडीनचा उत्कृष्ट स्रोत आहे. शिवाय, त्याचे म्युसिलेज विशिष्ट वैद्यकीय आणि औद्योगिक अनुप्रयोगांसाठी योग्य आहे.

जमीन : भेंडी पिकाची लागवड विविध जमिनीत करतात. परंतु चांगल्या पोषणसाठी मध्यम भारी ते काळी कसदार जमीन त्याचप्रमाणे वालुकामय चिकणमाती उपयुक्त ठरते. उत्तम पाण्याचा निचरा होणारी जमीन, हलक्या जमिनीत सेंद्रिय खताचा वापर करावा. चोपण क्षारयुक्त व चुनखडी युक्त जमिनीत भेंडीची लागवड टाळावी. जमिनीचा सामू ६.० ते ६.५ पर्यंत असावा पाण्याचा निचरा नसलेल्या जमिनीत वाढ खुंटते व फुलगळ होते.

हवामान :भेंडी हे उष्णकटिबंधीय पीक आहे. उगवण, वाढ आणि फळधारणेसाठी तापमान २५ ते ३५ अंश सेल्सिअस दरम्यान गरजेचे असते. वनस्पतीला उबदार हवामान आणि भरपूर सूर्यप्रकाश आवश्यक आहे. हे वेगवेगळ्या मातीच्या स्थितीत चांगले वाढते. उगवणीवर १० अंश सेल्सिअस पेक्षा कमी तापमानाचा परिणाम होतो.

भेंडी लागवडीसाठी जातींची निवड :१. फुले उत्कर्षा : ही जात महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथून विकसित केलेली असून फळे हिरव्या रंगाची,पाचधारी चमक, कोवळी व्? चमकदार आणि उन्हाळी लागवडी साठी आहे.२. फुले विमुक्ता : ही जात महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथून विकसित केलेली असून आकर्षक चमकदार हिरव्या रंगाची फळे विषाणुजन्य हल्दया रोगास पूर्ण प्रतिबंधक त्याचप्रमाणे चांगले उत्पादन २०० २१० क्विंटल / हे एवढे आहे.३. परभणी क्रांती : वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथून विकसित केलेली जात. फळे ७ बाय १० सेमी लांब हिरवी पुसा सावनी पेक्षा



कणखर व व्हायरस रोगास प्रतिकारक,फळे नाजूक तजेलदार हिरवी. पेरणी पासून ५५ दिवसात पहिला तोडा सुरु होतो. उन्हाळ्यात १४ १६ तोडे तर खरिपात २० तोडे होतात.

४. अर्का अनामिका : झाड उंच फळे लांब कोवळी हिरवी, फळाचा देठ लांब. व्हायरस रोगास प्रतिकारक. व्हेक्टरी ९ -१२ टन उत्पादन. त्याशिवाय राधिका, महिको १०, महिको हाइब्रिड १, अंकुर, रिद्धिमा, रश्मी, अजित उन्नति, अजित १५१, रोहिणी (निजिवुडू) या खासगी कंपनीच्या जाती बाजारात उपलब्ध आहेत.

लागवड : भेंडीची लागवड खरीप व उन्हाळी हंगामात केली जाते. खरीपासाठी बियांची पेरणी मे, जून महिन्यात करावी. लागवड सरी- वरंबा किंवा सपाट वाफ्यावर करावी. दोन ओळीतील अंतर ४५ -६५ व दोन रोपांतील अंतर ३० बाय ४५ सेमी ठेवावे. खरीपासाठी १२ बाय १५ किलो बियाणे लागते. जमिनीच्या मगदुराप्रमाणे व हवामानानुसार ५, ८ दिवसाच्या अंतराने पाणी द्यावे. लागवडीच्या सुरुवातीस बियाने उगवण चांगली होण्याकरीता जमिनीत योग्य ओलावा असणे आवश्यक आहे.

खत व्यवस्थापन : सेंद्रिय खतामध्ये शेणखत कंपोस्ट १५ ते २० टन / हेक्टर द्यावे. जीवाणु खते देतना ५० किलो शेणखत मिसळून २ किलो / हेक्टर अझोस्पिरिलम आणि २ किलो/ हेक्टर फॉस्फोबॅक्टेरियाचा वापर करावा. रासायनिक खते १०० : ५० : ५० नत्र, स्पूरद अणि पालाश किलो / हेक्टर अर्धे नत्र, संपूर्ण स्पूरद आणि पालाश पेरणीच्या वेळी द्यावे. उर्वरित ५० किलो नत्र पेरणी नंतर तीन समान हप्त्यांत विभागून ३० : ४५ : ६० दिवसांनी द्यावे.

पाणी व्यवस्थापन : उगवण चांगली होण्यासाठी बियाणे पेरल्यानंतर लगेच हलके पाणी द्यावे. उन्हाळ्यात पिकाला ४ ते ५ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. फळांच्या स्थापनेच्या टप्प्यावर ओलाव्याचा ताण फळांचा दर्जा आणि उत्पादन कमी करतो. साधारणपणे ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करून पिकाला पाणी व्यवस्थापन करावे. वेत व झाडाला भर द्यावा.

भेंडी पिकावरील रोग व्यवस्थापन तंत्र : १. भुरी रोग : पानांवर पांढऱ्या राखाडी रंगाची पावडर मायसेलियल वाढ पानांच्या खालच्या आणि वरच्या पृष्ठभागावर होते. हा डाग नंतर पसरत जाऊन संपूर्ण पानावर पावडर पसरल्यासारखे दिसते. भुरी रोगच्या नियंत्रणासाठी सल्फर ८० % डब्लू पी ३० ग्रम प्रति १० लीटर पाण्यातून फवारणी रोगाची लक्षणे दिसताच करावी १५ दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. प्रादुर्भाव जास्त दिसू लागल्यास हेक्झकोनाझॉल (कॉन्टटाफ) ०.५ मिली प्रती लिटर ह्या बुरशीनाशकाची फवारणी करावी.२. केवड़ा : हा विषाणूजन्य रोग असून, त्यास येलो व्हेन मोझॅक म्हणतात. केवड़ा रोगच्या नियंत्रणासाठी रोगट झाडे काढून नष्ट करावीत. पांढऱ्या माशीचे वेळीच नियंत्रण करावे. या साठी इमिडाक्लोरोप्रिड १७.५ ई. सी. २ मिली प्रति लिटर किंवा लैम्डा सायलोथ्रिन २.५ ई.सी २ मिली प्रति लिटर या पैकी एका कीटकनाशकाची फवारणी करावी.

किडी व्यवस्थापन तंत्र :१. पांढरी माशी : या किडीच्या नियंत्रणासाठी इमिडाक्लोरोप्रिड १७.५ ई.सी २ मिली प्रति लिटर कीटकनाशकाची फवारणी करावी. या किडीचा प्रादुर्भाव जास्त दिसू लागल्यास एसीटोमिप्रिड (प्राईड) २० एस पी ०.५ ग्रॅम प्रति लिटर फवारावे. निंबोळी तेल आलटून पालटून फवारावे.

२. फळे पोखरणारी अळी : किडकी फळे मातीत पूरावीत. फवारणीसाठी डेल्टा मेथ्रिन २.८ ई. सी. ८ मिली किंव्हा क्विनॉलफॉस २५ ई. सी. १६ मिली १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. भेंडी पिकाची काढणी व उत्पादन : पेरणी नंतर साधारणपणे ४० ते ५० दिवसात फुले लागण्यास सुरुवात होते व त्यानंतर ६ ते ८ दिवसात फळे तोडणीस तयार होतात. लहन कोवळ्या फळांची तोडणी २ ते ३ दिवसाच्या अंतराने करावी. तोडणीसाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांनी विकसित केलेल्या भेंडी हार्वेस्टचा वापर करावा. निर्यातीसाठी ५ ते ७ सेमी लांब कोवळी एकसारखी फळाची तोडणी करावी. काढणी सकाळी अथवा सायंकाळी करावी. उत्पादन हेक्टरी १५ ते २० टन एवढे मिळते.




## महत्वाच्या घटना

१८०१ : ग्रेट ब्रिटन या देशांत सर्वप्रथम जनगणना करण्यात आली होती.
१८३१ : फ्रेंज देशाच्या सेनेची स्थापना करण्यात आली होती.
१८४७ : हवाई साम्राज्याने सर्वप्रथम अधिकृत नाणी तयार केली होती.
१८४९ : अब्राहम लिंकन यांचा पेटंट साठी अर्ज; अमेरिकन राष्ट्रपतींचा पहिलाच असा अर्ज.टन
१८६२ : अमेरिकेत कागदी चलन नोटांची सुरवात झाली.
१८७३ : अलेक्झांडर ग्राहम बेल यांनी त्यांचा सहकारी थॉमस वॅटसन यांच्याशी दुरध्वनी वरून पहिल्यांदा संवाद साधला.
१८७६ : पहिला दूरध्वनी संपर्क (अलेक्झांडर ग्रॅहॅम बेल ने थॉमस वॅटसन शी संपर्क साधला).
१९२२ : प्रक्षोभक भाषण केल्याबद्दल महात्मा गांधींना ६ वर्षांची शिक्षा झाली.
१९२२ : चीनने परमाणु अप्रसार संधीवर हस्ताक्षर केले होते.
१९२९ : मिस्र देशाच्या सरकारने देशातील महिलांकरिता घटस्फोट संबंधी मर्यादित अधिकार दिले
१९४५ : द्वितीय विश्व युद्धादरम्यान अमेरिकन वायुदलाने जपानची राजधानी टोकियो येथे भीषण बाँब हल्ले केले होते. त्यामुळे टोकियो मधील एक लाखापेक्षा जास्त नागरिक मृत्युमुखी पडले होते
१९५२ : केंद्रीय मंत्री काकासाहेब गाडगीळ यांच्या हस्ते पिंपरी येथील हिंदुस्थान अँटिबायोटिक्स या पेनिसिलीन कारखान्याचा पायाभरणी समारंभ झाला.
१९५२ : पिंपरी येथे हिंदूस्थान अँटिबायोटिक्स या पेनिसिलिन कारखान्याचे काकासाहेब गाडगीळ यांच्या हस्ते उदघाटन
१९६९ : अतिशय हुषार व धाडसी वृत्तीची महिला गोल्डा मायर यांची इस्त्राईलच्या पंतप्रधानपदावर नियुक्ती झाली.
१९६९ : आफ्रिकी-अमेरिकन नागरिक तथा मानव अधिकारी संघर्षवादी नेता तसेच, अमेरिकन गांधी म्हणून प्रसिद्ध असणारे महान व्यात्ती मार्टिन लुथर किंग यांची हत्या करणारा गुन्हेगार जेम्स अर्ल रे याला पकडून ९९ वर्ष तुरुंगवासाची शिक्षा देण्यात आली होती.
१९७२ : वेलकम थिएटर निर्मित, विजय तेंडुलकर लिखित व कमलाकर सारंग दिग्दर्शित 'सखाराम बाईंडर' या नाटकाचा पहिला प्रयोग दादर येथील शिवाजी मंदिर येथे झाला.
१९७७ : सूर्यमालेतील युरेनस ग्रहाला शनीसारखी कडी असल्याचा शोध लागला.
१९८५ : भारताने पाकिस्तानला पराभूत करून मेलबोर्न येथे बेन्सन ॲण्ड हेजेस चॅम्पियनशिप हि क्रिकेट स्पर्धा जिकली.
१९८५ : भारतीय क्रिकेट संघाने रवि शास्त्री यांना चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्स हा किताब मिळाला.
१९९८ : भारतीय ग्रँडमास्टर विश्वनाथन आनंद याला लिनारेस सुपर ग्रँडमास्टर बुद्धीबळ स्पर्धेत विजेतेपद
२००३ : उत्तर कोरिया देशाने क्रूज मिसाईलची यशस्वी चाचणी घेतली
२००७ : युक्रेन देशाचा बुद्धिबळ खेळाडू वैसिलीइवानचुक यांना हरवून विश्वनाथ आनंद प्रथम स्थानी झेप घेतली होती.
२०१० : भारतीय संसदेच्या वरचे सभागृह म्हणजे राज्यसभेत महिला आरक्षण विधेयक मंजूर झाले.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६१५ : मोघल साम्राज्याचा कडवा, धर्मवेडा बादशहा बादशहा औरंगजेब याचा जन्म
१६२८ : मार्सेलिओ माल्पिघी इटालियन डॉक्टर (मृत्यू: ३० सप्टेंबर १६९४)
१८१२ : विक्टर तेश, बेल्जियन वकील व कायदा मंत्री
१८६३ : सर सयाजीराव गायकवाड (तिसरे) बडोद्याचे महाराज, सुधारणावादी संस्थानिक, पडदा पद्धती, बालविवाह, कन्याविक्रय यांना बंदी घालणारे कायदे केले. विधवा विवाहाला संमती दिली. (मृत्यू: ६ फेब्रुवारी १९३९)
१९१८ : 'स्वरराज' छोटा गंधर्व (मृत्यू: ३१ डिसेंबर १९९७)
१९१८ : हिंदुस्थानी गायक व मराठी नाट्यसंगीतातील गायक-अभिनेते-संगीत रचनाकार सौदागर नागनाथ गोरे यांचा जन्मदिन.
१९२९ : कविवर्य मंगेश पाडगावकर
१९३२ : विद्यागत भारतीय अवकाश वैज्ञानिक आणि भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे अध्यक्ष उडुपी रामचंद्र राव यांचा जन्मदिन.
१९३४ : भारतातील प्रख्यात समाजसुधारक लल्लन प्रसाद व्यास यांचा जन्मदिन.
१९४५ : माधवराव शिवाजीराव शिंदे केन्द्रीय रेल्वे मंत्री, नागरी हवाई वाहतूक मंत्री, काँग्रेसचे नेते व ग्वाल्हेरच्या राजघराण्याचे वंशज (मृत्यू: ३० सप्टेंबर २००१ मैनपुरी, उत्तर प्रदेश)
१९५७ : अल कायदा या अतिरेकी संघटनेचा संस्थापक ओसाम बिन लादेन याचा जन्म
१९५७ : ओसामा बिन लादेन, अल कायदा नामक इस्लामी मूलतत्त्ववादी संघटनेचा संस्थापक.
१९७० : भारतीय राजनीतिज्ञ व जम्मू काश्मीर राज्याचे माजी मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांचा जन्मदिन.
१९७४ : ट्विटर चे सहसंस्थापक बिझ स्टोन यांचा जन्म.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८७२ : जोसेफ मॅझिनी इटालियन स्वातंत्र्यवीर (जन्म: २२ जून १८०५)
१८९७ : सावित्री, क्रांतिज्योति, सावित्रीबाई फुले यांची पुण्यतिथी
१९१३ : हॅरियेट टबमन, अमेरिकन क्रांतिकारी
१९४० : रशियन कथा, कादंबरीकार आणि नाटककार बुल गाकॉव्ह मिखाईल यांचे निधन.
१९५९ : बॅ. मुकुंद रामराव जयकर कायदेपंडित, पं. मोतीलाल नेहरूंचे सहकारी, संसदपटू आणि पुणे विद्यापीठाचे पहिले कुलगुरू (जन्म: १३ नोव्हेंबर १८७३)
१९७१ : सीताराम पुरुषोत्तम तथा कर्मवीर अप्पासाहेब पटवर्धन कोकण गांधी (जन्म: ४ नोव्हेंबर १८९४)
१९९८ : लॉईड ब्रिजेस, अमेरिकन अभिनेता.
१९९९ : विष्णू वामन शिरवाडकर ऊर्फ 'कुसुमाग्रज' ज्ञानपीठ पुरस्कार विजेते लेखक, कवी व नाटककार (जन्म: २७ फेब्रुवारी १९१२)
१९८५ : कॉन्स्टंटिन चेरेनेन्को सोविएत रशियातील कम्युनिस्ट पक्षाचे सचिव (जन्म: २४ सप्टेंबर १९११)

cmyk



# महिलांचा सन्मान होणे हाच खरा जागतिक महिला दिन-माजी आ.केशवराव आंधळे

वडवणी । प्रतिनिधी

आपला भारत देश हा पुरुषप्रधान जरी असला तरी आजच्या काळात महिला या प्रत्येक क्षेत्रात पुरुषाच्या बरोबरीने आहेत त्यामुळे महिलांची प्रगती व सन्मान होणे हाच खऱ्या अर्थाने जागतिक महिला दिन म्हणून साजरा करणे आहे असे मत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई बीड जिल्हा व वडवणी तालुका यांच्यावतीने जागतिक महिला दिनानिमित्त कृषी उत्पन्न बाजार समिती वडवणी येथे आयोजित केलेल्या स्त्री शक्ती सन्मान सोहळ्या निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या वेळी माजी आमदार केशवराव आंधळे यांनी मांडले आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा बीड जिल्हा व वडवणी तालुका यांच्यावतीने काल दिनांक ८ मार्च शनिवार रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती वडवणी सभागृहात जागतिक महिला दिनानिमित्त स्त्री शक्ती सन्मान सोहळ्याचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार केशवराव आंधळे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून बाजार समिती सभापती संभाजी तात्या शिंदे, शिवसेना तालुकाप्रमुख विनायक बाप्पा मुळे ,मधुकररावजी धस सर ,लढा दुष्काळाशी फाऊंडेशनचे अध्यक्ष अँड राज पाटील,सचिव




जागतिक महिला दिनानिमित्त रुक्मीन नागापुरे एकल महिला संघटना बीड,चंद्रकला म्हैत्रे बाल प्रकल्प अधिकारी, छायाताई आंधळे सरपंच रुईपिंपळा, ज्योती शिंदे, कावेरी घुले, प्रमिलाताई माळी शिवसेना महिला आघाडी जिल्हा संघटक, शीलाताई उजगरे प्रहार संघटना जिल्हाध्यक्ष,समशाद शेख, गीतांजली लव्हाळे पत्रकार, कौशल्य कदम, रुक्मीन शिंदे, मनीषा उजगरे इत्यादी महिलांचा सन्मान करण्यात आला.

गोविंदराव आंधळे, जिल्हाउपाध्यक्ष प्रकाश आबा काशिद , जिल्हा उपाध्यक्ष सोमेश्वर सोनटक्के हे उपस्थित होते यावेळी प्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले यावेळी विविध विविध क्षेत्रात चांगले काम करणाऱ्या, कर्तुत्वान महिलांचा शाल, पुष्पगुच्छ, सन्मानपत्र,पुस्तक व झाड देऊन सन्मान करण्यात आला यावेळी मधुकरराव धस सर, विनायक बाप्पा मुळे यास इतर महिलांनी आपापले मनोगत व्यक्त केले यावेळी अध्यक्ष समारोप भाषणात बोलताना माजी आमदार केशवराव आंधळे म्हणाले की महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित केलेला स्त्रीशक्ती सन्मान सोहळा कार्यक्रम हा अभिमानास्पद असून तालुक्यातील पत्रकार हे सदैव विविध विकासाच्या बातम्या वर्तमानपत्रांमध्ये प्रकाशित करून विकास कामांमध्ये भर घालण्यासाठी प्रयत्न करत असतात पत्रकारामुळेच आज वडवणी तालुक्यात विकास होत आहे असे ते म्हणाले यावेळी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मुंबई जिल्हाध्यक्ष अँड विनायक जाधव ,तालुका अध्यक्ष अशोकराव निपटे, डिजिटल मीडिया तालुकाध्यक्ष सतीशराव मुजमुले, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती तालुका अध्यक्ष प्राध्यापक श्रीनिवास काकडे ,उपाध्यक्ष शांतिनाथ जैन ,तालुका सचिव अर्जुन मुंडे ,डिजिटल मीडिया तालुका उपाध्यक्ष शेख एजाज , शंकर झाडे शंकर जाधव, अशोक फपाळ, ज्ञानेश्वर लंगे, विष्णु डोईफोडे, गंगाभिष्म आंडील,अंकुश गवळी, इत्यादींनी परिश्रम घेतले.यावेळी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोकराव निपटे व आभारप्रदर्शन अँड विनायक जाधव यांनी केले.या कार्यक्रमाला बाजार समिती पदाधिकारी, कर्मचारी यासह अनेक जण उपस्थित होते.

# केएसपी विद्यालय येथे महिला दिन उत्साहात साजरा



बीड। प्रतिनिधी

शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी विद्यालय येथे महिला दिन साजरा करण्यात आला. महिला हक्क चळवळीतील केंद्रबिंदू म्हणून हा दिवस पाळला जातो. ८ मार्च हा दिवस समानता, पुनरुत्पादक हक्क आणि महिलांवरील हिंसा आणि अत्याचार यासारख्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करतो. शाळेतील विद्यार्थ्यांना महिला दिनाविषयी अवगत करण्यात आले.

या कार्यक्रमध्ये अंजलीताई शेळके, संस्थाध्यक्षा यांनी शाळेतील महिला कर्मचाऱ्याचे पुष्प गुच्छ देऊन महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. १९ व्या शतकाच्या अखेरपर्यंत, स्त्रियांना दुय्यम दर्जाची वागणूक दिली जात असे. अनेक रुढी परंपरा स्त्रीयावर लादल्या जात होत्या. चुल आणि मुल व घरामध्ये कष्ट करणे याचे साधन म्हणजे स्त्री, असा समज सर्वसाधारणपणे रूढ होता. म्हणूनच, समाजात समानतेने वावरणे, संपत्तीवरील अधिकार, तसेच शिक्षण किंवा मतदान यासारख्या अधिकारांपासून स्त्रिया वंचित होत्या. नोकरीसाठी स्वेच्छेने अथवा परिस्थितीमुळे घराबाहेर पडलेल्या स्त्रियांना नोकरीच्या ठिकाणी असलेली विषमता खटकू लागली. पुरुषांइतकेच काम करूनही वेतनात समानता नव्हती किंवा समान संधीही उपलब्ध नव्हत्या. आणि मग आपल्या हक्कांबाबत स्त्रिया जागृत होऊ लागल्या. स्त्रियांचे आत्मभान जागृत करण्याचे मोलाचे काम ज्यांनी केले त्यातल्या काही स्त्रियांच्या योगदानाबद्दल आपण सदैव कृतज्ञ असणे आवश्यक आहे. अशा प्रकारे शाळेतील महिला कर्मचाऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती ऋषिकेशजी शेळके जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख, तसेच शाळेतील सर्व महिला शिक्षिका, प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक शिक्षिकेत्तर कर्मचारी उपस्थित कार्यक्रम संपन्न झाला.

# महाबोधी बौद्ध विहारासाठी निदर्शने

## निदर्शनास उपस्थित राहण्याचे रिपाइंचे आवाहन

बीड। प्रतिनिधी

बिहार राज्यातील बोधगया येथील महाबोधी बौद्ध विहार कायदा १९४९ रद्द करुन महाबोधी बौद्ध विहार बौद्ध समाजाच्या ताब्यात देण्यात यावे. या मागणीसाठी रिपाइंकडून बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोमवार (दि.१०) मार्च रोजी सकाळी ११ वाजता निदर्शने केली जाणार आहेत. सदरील निदर्शने रिपाइंचे अध्यक्ष तथा सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले, युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली केली जाणार आहेत. या निदर्शनास रिपाइं पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.



प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हंटले आहे की, महाबोधी बौद्ध विहारास जागतिक वारसा स्थान म्हणून मान्यता मिळालेली आहे. शाक्य वंशाचे राजकुमार सिद्धार्थ गौतमांना या ठिकाणी पूर्णज्ञान (संबोधी/बुद्धत्व) प्राप्ती होऊन ते सम्यक संबुद्ध' बनले, व 'बुद्ध' म्हणून सर्वत्र ओळखले जाऊ लागले.असे असतांना तेथील बौद्ध विहाराचा ताबा हा हिंदूकडे आहे.त्यामुळे हे बौद्ध विहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे.यासाठी जगभरातील बौद्ध धम्मीय बिहार येथील बौधगया येथे एकत्रित आलेले आहेत. त्या अनुषंगाने देशात आणि राज्यात रिपाइं अध्यक्ष मंत्री रामदास आठवले, युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पु कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली निदर्शने केली जात आहेत. बीडमध्ये सोमवारी निदर्शने होवून, त्यानंतर तालुका पातळीवरही निदर्शने केली जाणार आहेत. त्यामुळे बीड येथील निदर्शनास रिपाइं पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन राजू जोगदंड, किसन तांगडे, महेश आठवले,बापू पवार, शाहू डोळस,अविनाश जोगदंड, माया मिसळे,प्रभाकर चांदणे, ज्ञानोबा माने, सुभाष तांगडे, विलास जोगदंड, भैय्यासाहेब मस्के,महेंद्र वडमारे, अक्षय कोकाटे, मनोज बोराडे, धम्मा पारवे,संजय हनवते,सचिन वडमारे,शाम वीर, गणेश वाघमारे, नामदेव वाघमारे बाप्पा जावळे, अनिता डोंगरे, रेश्मा जोगदंड, आनिता डोंगरे आदींनी केले आहे.

# न्यायालयीन व शासन निणयाप्रमाणे केंद्रप्रमुख पदोन्नती कराव्यात -अनिल जाधवर

बीड । प्रतिनिधी

आमरण उपोषण जिल्हा परिषद बीड अंतर्गत शिक्षण विभागातील केंद्रप्रमुख व ग्रेड मुख्याध्यापक पदोन्नती सन २०२४ २५ पासून प्रलंबित आहेत.शिक्षण विभाग व सामान्य प्रशासन विभागातील कर्मचारी व अधिकारी यांच्या नकारात्मक भुमीकेमुळे पदोन्नत्या प्रलंबित राहिल्यामुळे पदोन्नती पात्र शिक्षक पदोन्नती विना सेवानिवृत्त झाले, तसे तसेच पदोन्नत्या होत नसल्यामुळे दर महा सेवानिवृत्त होत आहेत. व त्यांना नियमानुसार मिळणाऱ्या पदोन्नती हक्का पासून वंचित राहत आहेत. ही बाब शिक्षक पदोनती संघर्ष समन्वय समितीने वेळोवेळी लेखी निवेदनाद्वारे व प्रत्यक्ष भेटीद्वारे प्रशासनाच्या निर्दशनास आणून दिलेली आहे . या पुर्वी ही जुलै २०२४ मध्ये पदोनती संघर्ष समितीने जिल्हा परिषदेसमोर आमरण उपोषण केले होते . शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी ऑगस्ट अखेरपर्यंत ग्रेड मुख्याध्यापक पदोन्नती करण्यात येतील तसेच न्यायालयीन निणयाच्या अधिन राहुन केंद्रप्रमुख पदोनती करण्यात येतील असे लिखित पत्र दिलेले आहे . परंतु केंद्रप्रमुख पदोनती व मुख्याध्यापक पदोनती बाबत कार्यवाही शुन्य आहे ,दिनांक २०.०२.२०२५ च्या मा .उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद च्या न्यायालयीन निणयाप्रमाणे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मुंबई. महाराष्ट्र शासनाच्या शासन आदेशाप्रमाणे सेवाजेष्ठतेनुसार केंद्रप्रमुख पदोन्नती दिनांक २७.०३.२०२५ पुर्वी करण्यात येऊन न्यायालयाला अहवाल सादर करण्याचे न्यायालयीन आदेश आहेत.परंतु या आदेशाचा चुकीच्या पद्धतीने अन्वयार्थ काढून जिल्हा परिषदेकडून ध चा मा करण्यात येत,आहे, न्यायालयीन, निणयामध्ये विषय निहाय तसेच सेवाजेष्ठतेनुसार वेगवेगळ्या यादया बनवुन न्यायालयास सादर करा असा उल्लेख न्यायलयीन आदेशामध्ये नाही.

परंतु जिल्हा परिषद प्रशासनाच्या . भूमकेमुळे त निश्चित पणेच दिशाभूल होत आहे. या पुर्वीचा प्रशासनाचा अनुभव लक्षात घेता जिल्हा परिषदेसमोर आमरण उपोषण करण्याचा निर्णय शिक्षक पदोनती संघर्ष समितीने घेतलेला आहे . सदरिल आमरण उपोषणाच्या निवेदनाच्या प्रती पालकमंत्री ना. अजित पवार, जयकुमार गोरे, शिक्षण मंत्री दादा भुसे, पंकजा मुंडे, आ. सुरेश धस, विजयसिंह पंडीत, नामिता मुंदडा, प्रकाश सोळंके, संदिप क्षिरसागर, ग्रामविकास सचिव, शिक्षण सचिव, जिल्हाधिकारी बीड यांना देण्यात आलेल्या आहेत. प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी व दिनांक:११.०३.२०२४ पुर्वी केंद्रप्रमुख पदोन्नती करणाकरिता प्राथमिक सेवाजेष्ठता यादी प्रसिद्ध करावी . ग्रेड मुख्याध्यापक पदोन्नती तात्काळ कराव्यात, शिक्षण विस्तार अधिकारी पदोन्नती करण्यात. पदोन्नती संघर्ष समिती प्रशासनास सहकार्य करण्यास सकारात्मक आहे . आमरण उपोषणाची वेळ आणू नये सर्व उपोषण कर्ते हे वयोगट पंचावन च्या पुढील आहेत. कांही ची सेवा निवृती तर मार्च अखेरिस आहे .

सेवाजेष्ठ शिक्षक त्रस्त झालेले आहेत . विहित मुदतीत तात्काळ पदोन्नत्या कराव्यात, नसता दिनांक :१२.०३.२०२५ बुधवार पासुन जिल्हा परिषदेसमोर आमरण उपोषणास बसणार असल्याचे लेखी निवेदन मा मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी ( प्रा) यांना दिले आहे.सदरिल निवेदनावर राजेंद्र खेडकर, नामदेव शिंदे, श्रीराम बहीर, हरिदास घोगरे, सुरेश पवार, अनिल जाधवर, अर्जुन बारगजे, प्रकाश अहिरे, दादासाहेब जायभाये, विष्णू मुळे, एकनाथ राहिंज, लक्ष्मीकांत अवढाळ यांच्या स्वाक्षरी आहेत .

# वेणूबाई केसकर यांना राज्यस्तरीय नारी सन्मान पुरस्कार जाहीर

आष्टी। प्रतिनिधी

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प छत्रपती संभाजीनगर अंतर्गत शासकीय माध्यमिक आश्रमशाळा सुरुडी ता आष्टी जि बीड या ठिकाणी सलग सात वर्षे विद्यार्थ्यांची मनोभावे सेवा करणाऱ्या, त्यांच्या आरोग्याकडे, खाण्यापिण्याकडे अतिशय बारकाईने लक्ष देऊन त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मदत करणाऱ्या, तसेच आपल्या अविरत सेवेचे प्रदर्शन करणाऱ्या वेणूबाई विलास केसकर, स्वयंपाकी यांना आदर्श नारी सन्मान २०२५ या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.आष्टी येथील युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष ए.बी. कदम व यांच्या त्यांच्या संघाने विद्यमानाने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून राज्यस्तरीय नारी सन्मान पुरस्कार आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये आपापल्या क्षेत्रांमध्ये दमदार कार्य करणाऱ्या परंतु प्रसिद्धीपासून दूर असणाऱ्या सर्व महिलांची माहिती घेऊन जागतिक महिला दिनानिमित्त त्यांना सन्मानित करण्याचे ठरवण्यात आले. तालुक्यातील उत्तम कार्य करणाऱ्या महिलांचा या कार्यक्रमात सन्मान होणार आहे. वेनुबाई केसकर यांची पुरस्कारासाठी निवड झाल्याने श्रीमती चेतना मोरे, प्रकल्प अधिकारी छत्रपती संभाजीनगर, शाळेचे मुख्याध्यापक सुधाकर राठोड तसेच सर्व कर्मचाऱ्यांकडून व सर्व वर्गातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# उपेक्षितांच्या शिक्षणाकडे डोळसपणे पाहिले पाहिजे- डॉ. जाधव

शिरूर। प्रतिनिधी

जागतिक पातळीवर भारतीय विद्यार्थी सक्षमपणे घडला पाहिजे. हे अपेक्षित असले तरी उपेक्षित घटकांच्या मुलांच्या शिक्षणाकडे डोळसपणे लक्ष दिले पाहिजे असे प्रतिपादन बालसाहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव यांनी शांतीवन, आर्वी येथे ता. ७ रोजी तालुकास्तरीय प्रशिक्षणाच्या समारोप प्रसंगी बोलताना केले. राज्य सुलभक सुभाष सांगळे, विष्णू मिसाळ, मंगल नागरे, मीना भिलारे यांची प्रमुख उपस्थिती होती.




बदलत्या काळाची आव्हाने पेलण्यासाठी अध्ययन अध्यापन पद्धतीत आमुलाग्र बदल घडणे अपेक्षित आहेत. माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील कसोटीवर टिकणारा जागतिक विद्यार्थी घडविण्याचे आव्हान आपल्यासमोर आहे ते आव्हान पेलावे लागेल असे डॉ. विठ्ठल जाधव यांनी सांगितले. प्रशिक्षणाच्या दरम्यान 'अटर का पटर,' 'भाकर आणि वावर' या रचना सादर केल्या. दिल्ली येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात गाजलेली 'माय आणि माती' कविता जाधव यांनी सादर केली. उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. तर सुभाष सांगळे यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० संदर्भात मार्गदर्शन केले. ज्येष्ठ अधिव्याख्याता स्मिता कापसे, गटशिक्षणाधिकारी जमीर शेख, उद्धव सुस्कर, शिवलिंग परळकर, कैलास तुपे, मनिषा बांगर यांनी प्रशिक्षणाचा हेतू सांगितला. दादासाहेब सादोळकर, दत्ता दुधाळ, दादाराव वाल्हेकर यांनी कविता वाचन केले. नितीन कैतके, महादेव राऊत, संतोष बांगर, अमोल म्हैत्रे, दत्तात्रय तावरे, अंबादास सिरसाठ, बाळासाहेब गवळी, फिरोज पठाण, रामदास पाखरे, शशिकांत पालकर, विकास खेडकर, नवीद पटेल यांची सुलभक म्हणून उपस्थिती होती. दत्तात्रय तावरे यांनी सुत्रसंचलन केले.

# सुरुडी आश्रम शाळेमध्ये जागतिक महिला दिन उत्साहात साजरा



आष्टी। प्रतिनिधी

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प छत्रपती संभाजी नगर येथील श्रीमती चेतना मोरे, यांच्या प्रेरणेने व शाळेचे मुख्याध्यापक श्री सुधाकर राठोड यांच्या नेतृत्वामध्ये शासकीय माध्यमिक आश्रम शाळा सुरुडी ता आष्टी जि बीड या ठिकाणी ८ मार्च २०२५ रोजी जागतिक महिला दिन अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून अ‍ॅड.अर्चना पाटील, येळे मॅडम, पोलीस स्टेशन आष्टी, यांची प्रमुख उपस्थिती होती. सदर कार्यक्रमांमध्ये जना कवरे, बाळूबाई डाखोरे, पूनम गायकवाड, श्रावणी कवरे, ज्योती ठाकरे, पूजा शेंबडे, शामल पतंगे, वंदना चिभडे यांनी विविध वेशभूषा साकारली होती. कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक सुधाकर राठोड , कविता पानसरे, संगीता जाधव, वैजनाथ आतकरे, प्रवीण पुंड , केतन काकडे, निलेश आहेर, मोहन जाधव, वेणूबाई केसकर यांच्यासह सर्व कर्मचारी तथा महिला पालक यांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रम पार पडला. सूत्रसंचालन वैदवी येटेकर व दुर्गा रेडे यांनी केले तर आभार सुरज शिंदे यांनी मानले.

# महिला मॅरेथॉन स्पर्धेचा धमाकेदार समारोप; ५३५ स्पर्धकांनी घेतला सहभाग

बीड। प्रतिनिधी

जागतिक महिला दिनानिमित्त येथील तुलसी शैक्षणिक समूहाच्या वतीने शनिवार दि.०८ रोजी बीड शहरात भव्य महिला मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे मुख्य उद्दिष्ट महिलांमध्ये आरोग्याची जागरूकता निर्माण करणे, त्यांच्या आत्मविश्वासात वाढ करणे आणि समाजात महिलांच्या सक्षमीकरणासाठी प्रेरणा देणे हे होते. तसेच महिलांना एकत्र येऊन त्यांच्या सामर्थ्याचा परिचय करून देण्याची संधी मिळावी या हेतूने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. लहानापासून ते जेष्ठापर्यंत ५३५ महिलांनी या मॅरेथॉन स्पर्धेत आपला सहभाग नोंदवून उत्साहाचे वातावरण निर्माण केले. स्पर्धेच्या उद्घाटनास क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, असीस्टंट पोलिस इन्स्पेक्टर वर्षा वावघडे, देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे, राम गायकवाड, प्रो.डॉ.मनोहर सिरसाट, प्राचार्य प्रदीप गाडे, योगा प्रतिष्ठानचे संचालक डॉ.अनिल थोरात, राजुशेठ पिंगळे, योगा प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब माने, गौतम चोपडे आदि मान्यवर उपस्थित होते.



सहभागी महिला स्पर्धकांचे १० ते १८ वर्ष वयोगटातील 'गट-अ' आणि १८ पेक्षा अधिक वयोगटातील 'गट ब' असे दोन गट करण्यात आले होते. वर्षा वावघडे यांनी सकाळी ६.४५ मी. हरिवा झेंडा दाखवून स्पर्धेची सुरुवात केली. छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण ते नगर रोड व परत छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण असे ५ किमी मीटरचे निर्धारित अंतर स्पर्धकांनी धावून पूर्ण केले. यावेळी स्पर्धेच्या मार्गावर प्रेक्षकांचा उत्साहवर्धक सहभाग होता. सदर मॅरेथॉन स्पर्धेमध्ये जल्हियातील वविध स्पोर्टअकॅडमी, योगा मित्र मंडळ, तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, तुलसी कनिष्ठ महाविद्यालय, तुलसी कॉलेज ऑफ नर्सिंग, तुलसी इंग्लिश स्कूल सह जल्हियातील शाळा, कॉलेजच्या विद्यार्थिनींनी मोठया उत्साहात सहभाग घेतला होता. विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे आणि प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. 'गट-अ' प्रथम बक्षिसाचे स्वरूप- सायकल, रोख रक्कम ५००० रुपये, सन्मान चिन्ह, व प्रमाणपत्र , दुसरे बक्षिसाचे स्वरूप- रोख रक्कम ३००० रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, तिसरे बक्षिसाचे स्वरूप- रोख रक्कम २००० रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे होते. यामध्ये प्रथम क्रमांक दिव्या दत्ता राठोड द्वितीय क्रमांक गुजर धनश्री बाबासाहेब, तृतीय क्रमांक बडगे कार्तिकी कृष्णा यांनी पटकावला. 'गट ब' प्रथम बक्षिसाचे स्वरूप- सायकल, रोख रक्कम ७००० रुपये, सन्मान चिन्ह, व प्रमाणपत्र , दुसरे बक्षिसाचे स्वरूप- रोख रक्कम ५००० रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, तिसरे बक्षिसाचे स्वरूप- रोख रक्कम ३००० रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे होते. यामध्ये प्रथम क्रमांक परिमला बाबासाहेब बाबर द्वितीय क्रमांक मोहिनी चंद्रसेन उबाळे, तृतीय क्रमांक पवार शामल हरिभाऊ, आदमने ऋतुजा उमेश यांनी पटकावला. तसेच, सहभागी झालेल्या प्रत्येक स्पर्धकाला सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात आले.या स्पर्धेच्या आयोजनाबद्दल नागरिकांनी आयोजकांचे विशेष कौतुक केले.अशा प्रकारच्या स्पर्धांमुळे शहरात क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन मिळते, असे नागरिकांनी मत व्यक्त केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी पोलीस प्रशासन, आरोग्य प्रशासन, क्रीडा विभाग, योगा मित्र मंडळ, समस्त बीडकर तसेच, तुलसी शैक्षणिक समूहातील विविध पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मेहनत घेतली.

# लिंबागणेश येथे जागतिक महिला दिन



लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत शनिवारी ता.८ मार्च जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने महिला शिक्षिका व मातांचा सन्मान करण्यात आला. यावेळी राष्ट्र उभारणीत अनमोल योगदान देणाऱ्या महिलांची त्यांच्या अतुलनीय कार्याची माहिती प्रमुख मार्गदर्शक मुख्याध्यापक आबासाहेब हांगे यांनी दिली. यावेळी विविध कलागुणांची जोपासना करणा-या आदर्श विद्यार्थीनींचा सत्कार करण्यात आला. *सक्षमतेचा, कल्पकतेचा, संयमाचा, कर्तव्यनिष्ठतेचा, ममतेचा... सन्मान करण्याचा आजचा दिवस असल्याने मातापालकांचाही सन्मान करून महिला दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. महिला दिनाचे औचित्य साधून चित्रकला स्पर्धा ही आयोजित करण्यात आली होती .यावेळी शाळेचे मुख्याध्यापक आबासाहेब हांगे ,ज्येष्ठ शिक्षक आगाम एस. बी. चौरे बी. बी. सहशिक्षिका कुलकर्णी माधुरी, माता पालक, सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री अमर पुरी सर यांनी केले.

cmyk

# सपकाळ, खा.पाटील यांच्या मार्गदर्शनातील सद्भावना यात्रेला प्रचंड प्रतिसाद

## नागरिकांकडून जागोजागी स्वागत; काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र काँग्रेसने पुढाकार घेऊन सुरू केलेल्या सद्भावना यात्रेचा पहिला टप्पा महिला दिन म्हणजे ८ मार्च रोजी बीड जिल्ह्यातून सुरू झाला. केज तालुक्यातील मस्साजोग ते बीड अशा सद्भावना पद यात्रेला सुरुवात झाली. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खा.रजनी पाटील यांच्या मार्गदर्शनातील सद्भावना यात्रेला प्रचंड प्रतिसाद मिळाला. काल नेकनूर येथे मुक्काम केल्यानंतर ही यात्रा आज बीडमध्ये दाखल झाली. कालपासून निघालेल्या या यात्रेचे वाटेत नागरिकांकडून जागोजागी स्वागत करण्यात आले. या यात्रेमुळे आणि जनतेकडून मिळालेल्या प्रतिसादाने काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला असल्याचे दिसून आले.

केज तालुक्यातील मस्साजोग येथे शनिवारी सकाळी नऊ वाजता सद्भावना पद यात्रेला सुरुवात झाली. यावेळी सर्वप्रथम स्व.संतोष देशमुख यांना आदरांजली वाहून छत्रपती शिवाजी महाराज तसेच महामानव डॉक्टर ाबासाहे ओंडकर यांना अभिवादन करण्यात आले. यानंतर सेवा दलाचे ध्वजारोहण संपन्न झाल्यानंतर पदयात्रा बीडकडे मार्गस्थ झाली. यावेळी या पदयात्रेसाठी सुमारे पाच हजार नागरिकांनी सहभाग नोंदवला आणि प्रत्यक्ष पद यात्रेमध्ये



चालायला सुरुवात केली. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खासदार रजनी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही पदयात्रा सुरू झाली आहे. सदरील पदयात्रा यशस्वी करण्यासाठी बीड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे यांनी मोठ्या प्रमाणावर संघटन करून आणि परिश्रम घेऊन पदयात्रेतील अर्धा टप्पा यशस्वीपणे पूर्ण केला. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची पदयात्रे संधी असलेली संकल्पना यावेळी दिसून येत होती. यात्रेला सुरुवात झाल्यानंतर ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणावर पद यात्रेचे स्वागत झाले आणि आजूबाजूच्या गावातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर पद यात्रेमध्ये सहभाग नोंदवला. मस्साजोग पासून वीस किलोमीटर अंतरावर आल्यानंतर दुपारी ढोणे मंगल कार्यालयामध्ये सर्वांनी भोजन करून विसावा घेतला. नंतर पाच वाजता पदयात्रा मार्गस्थ झाली. नेकनूर येथे सदरील पद यात्रेचा मुक्काम झाला. आणि रविवारी सकाळी साडेआठ वाजता सद्भावना पदयात्रा बीडकडे मार्गस्थ झाली. वाटेत अनेक ठिकाणी नागरिकांनी या यात्रेचे अत्यंत आनंदात स्वागत केले. यावेळी प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांनी नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या व्यथा जाणून घेण्याचा प्रयत्न केला. दरम्यान सदरील पद यात्रेमध्ये सहभागी झालेल्या सर्व नागरिकांनी कसल्याही प्रकारची उन्हाची तमा न बाळगता सामाजिक सलोखा निर्माण व्हावा या हेतूने मार्गक्रमण केल्याचे दिसून आले. विशेष करून जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये या यात्रेने उत्साह संचारला असून, याचा जिल्ह्यात काँग्रेसच्या वाढीसाठी मोठा फायदा होणार आहे.



बीड : महापारेषण द्वारे आयोजित स्पर्धा परीक्षेत दीक्षा अनिल करडूले हिची असिस्टंट इंजिनिअर वर्ग दोन पदी निवड झाल्याबद्दल मातृभूमी प्रतिष्ठान बीडच्या वतीने जागतिक महिला दिनी, तिचा शाल, पुष्पहार व सन्मानपत्र देऊन सत्कार करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे ,लक्ष्मण चाटे समवेत प्रशांत साळुंखे व पालक दिसत आहेत.

# सात वर्षानंतर होणाऱ्या पंचायत समिती आमसभेसाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे

## मागेल त्याला शेत तलाव मंजूर होणार -आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

दि.१५ मार्च २०२५ रोजी आष्टी पंचायत समिती आणि दि.१६ मार्च २०२५ रोजी पाटोदा आणि शिरूर (कासार) येथे आयोजित करण्यात आलेल्या आमसभेमध्ये सर्व घटकातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहावे असे आवाहन आ.सुरेश धस यांनी केले आहे.

आष्टी येथे निवासस्थानी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते ते



म्हणाले सन २०१७ नंतर आष्टी पाटोदा आणि शिरूर (कासार) पंचायत समिती येथे आमसभांचे आयोजन करण्यात आले आहे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अंतर्गत..

मागेल त्या शेतकऱ्याला शेततळे मंजूर करण्यात येणार आहेत. केंद्र शासनाच्या वतीने पूर्वी ३०३०३ या आकारमानाचे ६.५० लक्ष रू.किंमतीचे शेततळे मंजूर होत असत..

परंतु त्यामध्ये बदल करण्यात आला असून यानंतर आता २५२५३ या आकाराचे ५.०० लक्ष रु. किंमतीचे शेततळे मंजूर करण्यात येणार आहेत.. मग मागणी करण्यात येणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याला शेततळे मंजूर करण्यात येणार आहे पूर्वीच्या शेततळ्यांच्या प्रशासकीय मान्यता बदलून नवीन

◀◀ पान ३ वर



माजलगाव:- शहरातील हजरत बिलाल मोहल्ला येथील शेख फलक सद्दाम या चार वर्षीय मुलीने दि ०८ मार्च शनिवार रोजी पहिला रोजा (उपवास) ठेवला होता.

# बाजारात टरबुजांची आवक वाढली,पाच रुपयांपासून शंभर रुपयांपर्यत भरमसाठ विक्री

### कडक उन्हाळ्यात टरबुजाने मिळतो शरीराला थंडावा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

उन्हाची तीव्रता वाढत असताना अंबाजोगाई सह परिसरात मोठ्या प्रमाणात टरबुजांची आवक वाढली असून अगदीच ५ रुपयांपासून ते १०० रुपयांपर्यंतच्या दराने जागोजागी टरबुजांची विक्री होत असताना दिसत आहे. शहरात महत्वाच्या



ठिकाणी टरबुज विक्रीची दुकाने उघडली आहेत. असे असले तरी अंबाजोगाईत आजुबाजुच्या ग्रामीण भागातील शेतकरी वाहनांमधुन थेट टरबुजांची विक्री करीत आहेत. शहर व इतरत्र टरबुजाची विक्री वाढली आहेअशा कडक उन्हाळ्यात टरबुजांनी शरीराला थंडपणा मिळतो. उन्हाळ्यात ज्येष्ठ नागरिकांपासून ते लहान बालकांपर्यंत सर्वांची पहिली पसंती

◀◀ पान ३ वर

# पाटोदा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकांचा ऐतिहासिक निर्णय

## शिरूर कृषि उत्पन्न बाजार समितीला स्वातंत्र्य बहाल; तोट्यात असलेली मार्केट कमिटी आर्थिक वर्षात १६ लाख २२ हजाराने नफ्यात

पाटोदा । प्रतिनिधी

शिरूर तालुका निर्मितीनंतर पुन्हा शिरूर तालुक्याला स्वातंत्र्य मिळालं असुन कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकांनी शिरूर तालुक्यातील सर्वसामान्य शेतकऱ्यांना न्याय देत ऐतिहासिक निर्णय घेत शिरूर उत्पन्न बाजार समितीला स्वातंत्र्य बहाल केलं आहे.पाटोदा कृषी उत्पन्न बाजार



समितीच्या सभागृहात दि.८ मार्च शनिवारी रोजी सर्व संचालकांची कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती सौ.रूपाली किरण शिंदे पाटील, उपसभापती श्री.पांडुरंग नागरगोजे यांच्या अध्यक्षतेखाली महत्वपूर्ण बैठक संपन्न झाली.या बैठकीला प्रमुख उपस्थिती जेष्ठ नेते रामकृष्ण

◀◀ पान ३ वर

# ब्राह्मण समाज सभागृहाकरिता निधी कमी पडू देणार नाही - आमदार प्रकाश सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव मध्ये सामुदायिक उपनयन संस्कार हा कार्यक्रम समस्त ब्राह्मण समाजाने आयोजित केला हा स्तुत्य उपक्रम असून या ब्राह्मण समाजाच्या सभागृहाकरिता निधी कमी पडू देणार नाही असे आश्वासन आमदार प्रकाश सोळंके यांनी दिले तर सर्व समाजांनी आई-वडिलांना देवासमान मानून त्यांची सेवा करावी हीच ईश्वर सेवा आहे असे मत आदिलाबाद मठ संस्थानचे मठाधिपती योगानंद यांनी व्यक्त केले.

माजलगाव येथे दिनांक ९ मार्च रविवारी सामुदायिक उपनयन संस्कार कार्यक्रमाचे आयोजन समस्त ब्राह्मण समाजाच्या वतीने करण्यात आले होते.या कार्यक्रमास आमदार प्रकाश सोळंके,योगानंद सरस्वती स्वामी, माजी आमदार मोहनराव सोळंके, माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील,मोहन जगताप,बाबुराव पोटभरे, डी.के.देशमुख, नारायण डक अँड. भानुदास डक नितीन नाईकनवरे , संभाजी शेजुळ,जयदत्त नरवडे,अमरनाथ खुरपे,अरुण राऊत, तुकाराम



### आई वडील सर्वश्रेष्ठ - योगानंद स्वामी

येवले, सुरेंद्र रेदासनी, अँड.कालिदास थिगळे,गजानन जोशी,अँड.मकरंद पत्की, डॉ.श्रीराम खळगे,कचरू खळगे,डॉ.मधुकर घुबडे,शरद यादव,विजय शिंदे, यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना आमदार प्रकाश सोळंके म्हणाले की माजलगाव येथील समस्त ब्राह्मण समाज सातत्याने विविध सांस्कृतिक धार्मिक कार्यक्रमांच्या आयोजन करतात. ब्राह्मण समाजाच्या परशुराम आर्थिक विकास महामंडळासाठी मी विधानसभेमध्ये लक्षवेधी देखील मांडली होती आज त्याला खऱ्या अर्थाने मूर्त स्वरूप प्राप्त झाले आहे, आगामी काळात देखील ब्राह्मण समाज करिता

◀◀ पान ३ वर

# अंजली रेवडकर आदर्श क्रीडा-शिक्षिका पुरस्काराने सन्मानीत

अंबाजोगाई । प्रतिनिधी

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून येथील आधार मल्टीस्टेटच्यावतीने गोदावरी कुंकूलोळ योगेश्वरी कन्याशाळेतील अंजली रेवडकर (निर्मळे) यांना "आदर्श क्रीडा शिक्षिका पुरस्काराने " सन्मानीत करण्यात आले.

पुरस्काराचे स्वरूप गौरवचिन्ह , शाल व पुष्पगुच्छ होते . कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून पोलिस उपअधिक्षक चेतना तिडके होत्या . संयोजक अॅड सुनिल सौंदरमल यांची



व्यासपीठावर उपस्थिती होती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवृत्त प्राचार्य डॉ . कमलाकर कांबळे होते . आधार मल्टी स्टेटच्या वतीने विविध क्षेत्रातील नामवंत महिलांचा पुरस्कार देऊन सत्कार केला .

अंजली रेवडकर यांनी मार्गदर्शन केलेल्या मुलींच्या चारही हॉकी संघाने जिल्ह्यात प्रथम पारितोषिक मिळविले . एक

◀◀ पान ३ वर

# जिल्हा परिषदेच्या वतीने उत्कृष्ट काम करणाऱ्या महिलांचा सन्मान

बीड । प्रतनिधी

जिल्हा परिषदेच्या जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन , उमेद अभियान , ग्राम पंचायत विभाग तसेच महिला बालकल्याण व शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हयात पाणी, स्वच्छता व आरोग्य पाणी गुणवत्ता संबंधित उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महिलांना प्रेरणा देण्यासाठी जागतिक महिला दिवस निमित्ताने पाणी व स्वच्छता संबंधित उत्कृष्ट व आदर्श काम करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला आहे. हा कार्यक्रम बीड तालुक्यातील मंजरी ग्रामपंचायत येथे झाला.

जिल्ह्यात जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सर्व





गावे या उपक्रमात सहभागी आहेत. जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षच्यावतीने जिल्हयात दरवर्षी जागतिक महिला दिनी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.त्यानुसार याहीवर्षी जागतिक महिला दिवस येत्या सर्व ग्रामपंचायती मध्ये बचत गटातील महिला, उमेद अभियान, किशोरवयीन मुली व विद्यार्थीनी,स्वच्छता कर्मचारी,पाणी व स्वच्छता समितीचे सदस्य व ग्रामपंचायत सदस्य आणि समुदायातील प्रभावशाली लोकांचा समावेश करून पाणी, स्वच्छता व आरोग्य संबंधित संदेशाद्वारे जनजागृती करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये विशेष महिला सभेचे आयोजन करण्यात आले असून ग्रामपंचायतीमध्ये पाणी, स्वच्छता व आरोग्य संबंधित कार्यक्रमाच्या अंमलबजावणी दरम्यान सद्यस्थितीत येणाऱ्या अडी अडचणी बाबत चर्चा करण्यात आली.

पाणी गुणवत्ता अभियान अंतर्गत तालुका स्तरावर आयोजित करणेत कार्यशाळेत महिला आरोग्य अधिकाऱ्यांचे महिलांच्या आरोग्याविषयी मार्गदर्शन करण्यात आले आहे.यावेळी महिलांचा विशेष सन्मानित करण्यात आला आहे.सदर विशेष सत्कार हा पाणी व स्वच्छतेचे व्यवस्थापन करणारे स्वयंसेवी गट, नेते, किशोरवयीन चॅम्पियन, पाणी गुणवत्ता तपासणी तसेच देखभाल दुरुस्ती करणाऱ्या महिला (एफटीके किट वापरून) आणि वॉशच्या कार्यात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या सर्व व्यक्तींचा समावेश होता.जिल्हयातील सर्व ग्रामपंचायतीमधून एक महिला अनुकूल आदर्श ग्रामपंचायतींची (मॉडेल) ग्रामपंचायत म्हणून उभारणी करणेत आली आहे. जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये सर्व विभागाच्या वतीने एकाच ठिकाणी जिल्हा परिषदेच्या शाळेच्या प्रांगणात या कार्यक्रमाच्या आयोजन करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी दिल्या होत्या. कोणत्याही विभागाचा वैयक्तिक कार्यक्रम न घेता सर्व विभागाने एकत्र येऊन एकाच ठिकाणी कार्यक्रम घेतल्यामुळे या कार्यक्रमाचे महत्त्व वेगळ्याने अधोरेखित झाले.

जिल्हयात जागतिक महिला दिनी पार पडले विविध उपक्रम

सर्व ग्रामपंचायतीमध्ये स्वच्छतेसाठी धाव वॉशरनचे आयोजन करण्यात आले त्यात उमेद अभियानाने

◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# आरोपींना फाशीच झाली पाहिजे, टोळ्या सांभाळणाऱ्यांना थांबवलं पाहिजे, बारामतीच्या मोर्चानंतर काय म्हणाले धनंजय

बारामती । प्रतिनिधी

आम्ही न्याय मागण्यासाठी आलो आहे. कायदा सुव्यवस्थेचं भयानक वास्तव आहे. घडलेल्या आणि घडत असलेल्या घटना अत्यंत भयावह असल्याचे मत धनंजय देशमुख (ऊहरपरपक्षरू ऊशीहर्ळिह) यांनी व्यक्त केले. आम्ही तुमच्या दारात आलोय आम्हाला न्याय द्या, अशी विनंती धनंजय देशमुखांनी उपमुख्यमंत्री अजित पवार आंना केली. संतोष देशमुख हत्या प्रकरणी बारामतीत आज आक्रोश मोर्चा निघाला. यानंतर धनंजय देशमुख बोलत होते. आरोपींना फाशीच झाली पाहिजे, पण जे लोक अशा टोळ्या सांभाळतात त्यांना थांबवले पाहिजे असे धनंजय देशमुख म्हणाले.



तुम्ही बीडचे पालकत्व घेतलं आहे. ज्यावेळी तुम्ही बीडला याल तेव्हा परिस्थिती जाणून घ्या. आमच्यावर विश्वास न ठेवता तुम्ही कागदपत्रे पुरावे पहा आणि न्याय द्या असे वक्तव्य धनंजय देशमुख यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना उद्देशून केलं. घटनाक्रम कसा घडला तो जाणून घ्या. दिरंगाई होत चालली आहे, याला जबाबदार कोण? कोणी जबाबदारी घ्यायची? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

आज माझा जन्मदिवस होता. संतोष देशमुख यांनी जे गावासाठी केलं त्याची एक एक आठवण होत होती.भावनिक हो म्हणावे लागत नाही, दुःखाचे गाठोडे खांद्यावर घेऊन आम्ही फिरत आहोत. न्याय मागत आहोत. ते मिळवल्याशिवाय शांत बसणार नाही असे धनंजय देशमुख म्हणाले. फरार आरोपीला कोणी पोसले? कोणी सांभाळ केला? कोणी फरार केलंय़ हे समोर आल्याशिवाय राहणार नाही असंही ते म्हणाले. त्याला लवकरात लवकर अटक करून फाशीची शिक्षा द्या. जे काही करायचे ते यंत्रणेने करायला हवं असंही त्यांनी सांगितलं.

आमची ठोस भूमिका ही आहे की या गुन्ह्यात कोणीही असला ज्याने काही हस्तांतरण केलं आहे. जे आठ आरोपी आहेत. जे मकोका, खून अपहरण याच्या गुन्ह्यात आहेत. यापैकी एकाच जर खून झाला असता तर धनंजय मुंडे यांची काय भूमिका राहिली असती? कसा न्याय मागितला असता? तसाच आम्ही अजितदादांना बारामतीतून आवाहन करत न्याय मागत आहोत. आम्हांला या गोष्टीचा उलघडा करा की हे आरोपी कोणाचे आहेत? कुठे राहत होते? कुठून तुमचा कारभार हाकत होते? हे सर्वांसमोर आहे ते एकदा जाणून घ्या आमचा विचार करा अशी तुम्हाला विनंती असल्याचे धनंजय देशमुख म्हणाले. उपमुख्यमंत्री अजित पवारांना बारामतीतून हात जोडून विनंती करत आहे की आमच्या जिल्ह्यात जी अराजकता माजली आहे ती बाजूला करा. जे चुकीचे आहे ते बाजूला काढून टाका तुम्हाला कोणीही साथ द्यायची सोडणार नाही असे धनंजय देशमुख म्हणाले. कृष्णा आंधळे हा फरार आरोपी असताना त्याच्या जन्मदिनादिवशी त्याचे स्टेटस ठेवले जात आहेत. अशोक मोहितेवर हल्ला केला जात आहे. या घटना वारंवार घडत आहेत. शासन कडक होत नाही तोपर्यंत अशा घटना थांबणार नाहीत.विविध धमक्या दिल्या जात आहेत असे धनंजय देशमुख म्हणाले. जशी जशी चौकशी होईल, सप्लिमेंटरीमध्ये कोणी कोणी मदत केली ते समोर येईल. जो कोणी यांची पाठराखण करत असेल ते समोर येणार आहे.स्वतःला ते वाचवू शकतील, पण अठरा पगड जातीच्या लोकांपासून ते वाचू शकणार नाहीत असे देशमुख म्हणाले.

### अठरापगड जातीने आम्हाला सांभाळले

एका पत्रकाराने मला विचारले ९० दिवसात कुटुंबाला कसे सावरले? यावर बोलताना धनंजय देशमुख म्हणाले की, मी कुटुंबाला नाही सांभाळले तर अठरापगड जातीने आम्हाला सांभाळले. आरोपींना फाशीच झाली पाहिजे, पण जे लोक अशा टोळ्या सांभाळतात त्यांना थांबवले पाहिजे असे धनंजय देशमुख म्हणाले. हे लोक समाजात काही चांगलं होऊ देत नाहीत. आरोपीच्या समर्थनार्थ बीड मध्ये मोर्चे काढण्यात आले हे दुर्दैवी आहे. माझ्या भावाची अपहरण करून हत्या केली. आमच्या कुटुंबाला न्यायासाठी उन्हातन्हात फिरायची वेळ या लोकांनी आणली. आपण आम्हाला शेवटपर्यंत साथ द्या. गावात कोणताच सण सूद होत नाही. कारण अण्णावर लोकांचे प्रेम होते. संतोष अण्णा गावाला सांभाळत नव्हते तर गावच अण्णाला सांभाळत होते. सरकारला आवाहन केलं आहे की गुन्हेगारीचे पाळंमुळं उखडून फेका असे धनंजय देशमुख म्हणाले.

# 'पोलीस उपायुक्त आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षकाच्या अंगावर पेट्रोल टाकले'; शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांचे कृत्य

पुणे । प्रतिनिधी

**पुणे शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे कार्यकर्ते नरेंद्र पावटेकर यांनी आंदोलना दरम्यान पोलीस उपायुक्त संदीपसिंह गिल्ल आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रशेखर सावंत यांना शिवीगाळ करत त्यांच्या अंगावर पेट्रोल टाकले. सुदैवाने पुढील अनुचित घटना थोडक्यात टळली. यावर पोलिसांनी आंदोलकांना चांगलाच चोप देत अद्दल घडवली. ही घटना महापालिका मेट्रो स्थानकावरील मेट्रो मार्गिकेवर घडली. याप्रकरणी १५ ते २० कार्यकर्त्यांना शिवाजीनगर पोलिसांनी ताब्यात घेतले असून गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु आहे.**



कसबा विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्ते नरेंद्र पावटेकर यांनी दुपारी दोनच्या सुमारास महापालिका मेट्रो स्टेशनमध्ये कार्यकर्त्यांसह प्रवेश केला. जाताना त्यांच्या हातामध्ये पेट्रोलच्या बाटल्या होत्या. सोबत काही महिला कार्यकर्त्याही होत्या. त्यांनी थेट मेट्रो मार्गिकेवर (ट्रॅक) धाव घेत आंदोलन सुरु केले. मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी तातडीने पोलिसांशी संपर्क साधला. पोलीस उपायुक्त गिल्ल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सावंत पथकासह घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आंदोलकांना हात जोडून तब्बल तासभर विनंत्या केल्या. त्यांची समजूत काढून खाली उतरुण तोडगा काढू असेही सांगितले.

मात्र आंदोलक ऐकण्यास तयारीत नव्हते. एवढ्यात पावटेकर आणि एक तरुण मार्गिकिवरील कढड्यावर चढले. तेथून ते कधीही तोल जाऊन खाली पडले असते. गिल्ल यांनी समजूत काढण्याचा प्रयत्न केला असता, त्यांना शिवीगाळ करण्यात आली. यामुळे त्यांनी पक्षाचे नेते प्रशांत जगताप यांना फोन लावून दिला. मात्र पावटेकर यांनी जगताप यांनाच शिवीगाळ करत ते आम्हाला पुढे येऊ देत नाही असते म्हणत बोलण्यास नकार दिला.

परिस्थितील हाताबाहेर जात असताना पुन्हा एकदा पोलिस आंदोलकांच्या दिशेने जाऊ लागले. तेव्हा पावटेकर यांनी उपायुक्त गिल्ल आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक सावंत यांच्या अंगावर बाटलीतून आणलेले पेट्रोल टाकले. यामुळे पोलीस पथक गडबडले. गिल्ल यांनी आक्रमक पवित्रा घेत आंदोलकांची गचांडी पकडत त्यांना मेट्रो स्थानकात सहकाऱ्यांच्या मदतीने ओढत आणले.

उद्दामपणा करणाऱ्या कार्यकर्त्यांना चांगलाच चोप देत गाडीत कोंबले. यानंतर सर्वांना शिवाजीनगर पोलीस ठाण्यात आणण्यात आले. आंदोलकांच्या झटापटीत पोलीस अधिकारी आणि कर्मचारी जखमी झाले. सुदैवाने उन्हामुळे किंवा मेट्रोच्या ओव्हरहेड वायरमुळे पोलिसांच्या अंगावरील पेट्रोलने पेट घेतला नाही, अन्यथा मोठा अनर्थ घडला असता.

### बारामतीच्या डॉ. सतीश पवार यांना व्हिएन्नामध्ये शोधनिबंध सादर करण्याची संधी

बारामती : ऑस्ट्रियातील व्हिएन्ना येथे झालेल्या युरोपियन काँग्रेस ऑफ रेडियॉलॉजी या आंतरराष्ट्रीय परिषदेत बारामतीचे सोनोग्राफीतज्ज्ञ डॉ. सतीश पवार व वेदनानिवारण तज्ज्ञ डॉ. कीर्ती पवार यांनी गुडघेदुखीवरील शोधनिबंधाचे सादरीकरण केले.

जगभरातून वीस हजारांहून अधिक डॉक्टर्स या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी उपस्थित होते. रेडियॉलॉजी या विषयावरील जागतिक स्तरावर ही परिषद अग्रमानांकीत समजली जाते. या परिषदेच्या व्यासपीठावरुन बारामतीच्या पवार दांपत्यास हा शोधनिबंध सादर करण्याची संधी प्राप्त झाली.

सोनोग्राफीच्या मदतीने गुडघेदुखी होण्यामागील कारणांचा शोध असा या शोधनिबंधाचा विषय होता. गुडघ्यातील सांधेरोपणानंतरही अनेकदा रुग्णांना गुडघेदुखीचा आजार सतावत असतो. अनेकांना चालतांना त्रास होतो, अशा गुडघे बदललेल्या रुग्णांच्या वेदनांसाठी कारणीभूत स्नायूंची सोनोग्राफी कशा पध्दतीने करता येऊ शकते, त्या कारणांचे विविध प्रकारे वर्गीकरण या शोधनिबंधाच्या माध्यमातून या दांपत्याने जगासमोर सादर केले. या संशोधनाच्या सादरीकरणात डॉ. सतीश पवार यांची मुलगी डॉ. सम्राज्ञी पवार यांनीही त्यांना मदत केली.

# तरुणांनी केले होते अमली पदार्थांचे सेवन, येरवड्यातील लघुशंका प्रकरण

पुणे । प्रतिनिधी

आलिशान कार मधून येत येरवड्यातील शास्त्रीनगर चौकात रस्त्याच्या मधोमध गाडी थांबवून लघुशंका आणि अश्लील चाळे करणाऱ्या तरुणांनी अमली पदार्थाचे सेवन केल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे. तरुणांनी शुक्रवारी रात्रभर कोरेगाव पार्क मुंढवा रस्त्यावरील एका पंचतारांकित हॉटेलमधील पबमध्ये पार्टी केली. तेथील सीसीटीव्हीचे चित्रीकरण पोलिसांनी तपासले आहे.

गौरव मनोज आहुजा (वय २५, रा. साठे कॉलनी, टिळक रस्ता) आणि भाग्येश प्रकाश ओसवाल (वय २२, रा. प्राइड हाइट्स सोसायटी, मार्केटयार्ड) असे या तरुणांची नावे आहेत. त्यांच्यावर सार्वजनिक ठिकाणी उपद्रव निर्माण करणे, सार्वजनिक ठिकाणी अश्लील व असभ्य वर्तन करणे, मोटार वाहन कायद्यानुसार सार्वजनिक ठिकाणी रहदारीला अडथळा निर्माण करणे आणि दारूबंदी कायद्यानुसार येरवडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिस शिपाई गणेश अशोक थोपटे (वय ३६) यांनी फिर्याद दिली आहे.

शनिवारी (ता. ८) सकाळी साडेसात वाजता येरवड्यातील शास्त्रीनगर चौकात हा प्रकार घडला होता. गौरवने केलेल्या प्रकाराची चित्रफीत समाजमाध्यमांत प्रसारित झाल्यावर पोलिसांनी दोघांवर गुन्हा दाखल केला होता. भाग्येश ओसवाल पोलिसांनी शनिवारी संध्याकाळी अटक केली आहे. तर गौरव आहुजा कराड येथे पोलिसांना शरण आला आहे. पोलिस उपनिरीक्षक नंदकुमार केकान या गुन्ह्याचा तपास करत आहेत.

दोघांना सोमवारपर्यंत पोलिस कोठडी

पोलिसांनी या दोघांना रविवारी दुपारी येथील न्यायालयात हजर केले होते. आरोपींनी अमली पदार्थाचे सेवन करून संगनमताने हा गुन्हा केल्याचे सीसीटीव्ही चित्रीकरणात दिसून येत आहे. त्यांची चौकशी केली असता, दोघे आरोपी तपासात सहकार्य करत नसून, उडवाउडवीची उत्तरे देत आहेत. आरोपी गुन्हा करण्यापूर्वी कोणत्या ठिकाणी अमली पदार्थ अथवा मद्याचे सेवन केले होते, त्यांना पळून जाण्यास कोणी मदत केली, त्यांचे आणखी कोणी साथीदार आहेत का, याबाबत तपास करायचा आहे. त्यासाठी आरोपींची पोलिस कोठडीत चौकशी आवश्यक आहे, असा युक्तिवाद सरकारी वकील सुनीता डांगे यांनी केला. बचाव पक्षातर्फे ड. पुष्कर दुर्गे आणि ड. सुनील रामपुरे यांनी बाजू मांडली. दोन्ही पक्षांची बाजू ऐकल्यावर प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एन. एस. बारी यांनी दोन्ही आरोपींना सोमवारपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.

## गांजा विक्री प्रकरणी आरोपीस पाच वर्षे कारावास

महाळुंगे इंगळे : खालुंब्रे (ता. खेड) येथील एकाने अवैधरितीने गांजा विक्री केल्याने खेड (राजगुरूनगर) जिल्हा सत्र न्यायालयाने आरोपीस पाच वर्षे सश्रम कारावास आणि पन्नास हजार रुपये दंड आणि दंडाची रक्कम न भरल्यास आणखी एक वर्ष सश्रम कारावास, अशी शिक्षा ठोठवण्यात आली आहे.

एप्रिल २०२४ मध्ये गुन्ह्याचा तपास पिंपरी चिंचवड पोलीस उपायुक्त शिवाजी पवा, सहायक पोलीस आयुक्त राजेंद्र गौर, महाळुंगे इंगळे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन गीते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संतोष जायभाय यांनी उत्कृष्ट तपास केला.

तसेच या गुन्ह्यातील गांजा विक्री प्रकरणी आरोपींना न्यायालयाने फास्टट्रॅकवर गुन्हा



चालवल्याने एक वर्षाच्या आत आरोपीला शिक्षा ठोठवली आहे. आरोपपत्र सादर केल्यापासून एका वर्षाच्या आत न्यायालयाने शिक्षा झालेल्या गुन्ह्यात हा गुन्हा पहिलाच असल्याची माहिती मिळाली.

# इंदापूरच्या भिमाई आश्रमशाळेत महिला दिन उत्साहात साजरा



इंदापूर, मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्ट इंदापूर संचलित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आश्रमशाळा तसेच मुलांचे व मुलींचे अनुदानित वसतिगृह यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन साजरा केला.

भीमाई आश्रमशाळेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक संकुलात प्राचार्या अनिता साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन केले. यावेळी विद्यार्थिनींनी बहुजन महामातांच्या प्रतिमांना पुष्पहार व संस्थेचे दिवंगत अध्यक्ष रत्नाकर मखरे यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी विद्यार्थिनींनी कर्तबगार महिलांविषयी कविता गायन तसेच मनोगते व्यक्त केली. यावेळी सहशिक्षक नानासाहेब सानप यांनी जागतिक महिला दिनाचे महत्त्व विशद केले. यावेळी शाळेतील महिला शिक्षकांचा सन्मान करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. ड. समीर मखरे, साहेबराव पवार, प्राचार्या अनिता साळवे, सविता गोफणे, मनीषा मखरे, मेघा यादव, नीता जगताप आदी उपस्थित होते.

# नायजेरियन गुन्हेगाराला व्यावसायिकाने दिले पकडून

पुणे । प्रतिनिधी

खरेदीच्या बहाण्याने पुण्यातील एका व्यावसायिकाला मुंबईला बोलावून कागद द्रावणात बुडवून त्याच्या चलनी नोटा बनवित असल्याचे दाखविले. २० लाख रुपये दिल्यास हे केमिकल देण्याची तयारी त्याने दाखविली. मात्र, प्रसंगावधान दाखवत तरुण व्यावसायिकाने पैसे घेण्यास पुण्यात बोलावून या नायजेरियन नागरिकाला पोलिसांकडे पकडून दिले.

याबाबत २७ वर्षीय व्यावसायिकाने कोथरूड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून पोलिसांनी फोनांग हायसीथ असाह (वय ३६) याला अटक केली आहे. ओंकार धारिया यांचे स्टेशनरी मालाचे दुकान आहे. ते मसाले निर्यात करण्याचे काम करतात. त्यांना १० फेब्रुवारी रोजी व्हॉट्सॲपवर स्पाईसेस व चिली यांची मोठ्या प्रमाणावर खरेदी-विक्री करायची असल्याबाबत मेसेज मिळाला.

त्यानंतर २६ फेब्रुवारी रोजी ते मुंबईतील जुहू येथील हॉटेल जे डब्ल्यू मेरिएट येथे मीटिंगला गेले. तेथे पिटर आणि असाह हे दोघे ओंकार व त्यांचा भाऊ स्वप्निल धारिया यांना भेटले. त्यांनी स्पाईसेस व चिली व्यापाराबाबत जास्त काही माहिती न देता, त्यांना जास्त पैसे कमविण्याचा मार्ग सांगितला. त्यानंतर त्यांनी नोटाच्या आकाराचे पांढरे कागद एका द्रावणात बुडवून त्यापासून भारतीय चलनी नोटा तयार करण्याचे प्रात्याक्षिक दाखविले. त्यानंतर त्यांना घेऊन ते जुहू मार्केटमध्ये गेले. तेथे त्यांनी या नोटा देऊन काही वस्तू खरेदी केल्या.

त्यामुळे त्यांचा सुरुवातीला त्यावर विश्वास बसला. त्यानंतर फोनांग असाह याने त्यांना २० लाख रुपये दिल्यास त्या बदल्यात प्रात्याक्षिकात दाखविल्याप्रमाणे ते चलनी नोटांमध्ये रूपांतरित करण्यासाठी लागणारे केमिकल तसेच १ कोटी भारतीय चलनी रुपयांमध्ये रूपांतरित होणारे ५०० रुपये नोटेच्या आकाराचे कोरे कागद देण्याचे आश्वासन दिले. त्याबदल्यात ॲडव्हॉन्स म्हणून त्यांच्याकडून १० हजार रुपये घेतले. त्यानंतर ते परत पुण्याला आले.

तेव्हापासून ते असाहबरोबर व्हॉट्सॲपद्वारे संपर्कात होते. ७ मार्च रोजी सकाळी साडेअकरा वाजता असाह याने तो पुण्यात कोरेगाव पार्क येथील हॉटेलमध्ये थांबल्याचे सांगितले. ओंकार धारिया यांनी ही बाब कोथरूड पोलिसांना कळविली. त्याने हे सर्व केमिकल व नोटांचे बंडल देण्यापूर्वी तुम्ही देत असलेले पैसे पाहण्यासाठी एका खोलीची व्यवस्था करायला सांगितले. त्यानुसार आयडीएल मेट्रो स्टेशनच्या बाजूला असलेल्या कृपालु सोसायटीत पोलिसांनी एका खोलीची व्यवस्था केली. ओंकार धारिया हे दुपारी आयडीएल मेट्रो स्टेशन बाहेर असाह याला भेटले. गाडीतून ते कृपालु सोसायटीत आले.

ओंकार धारिया यांनी हाच तो नोटा बनवून देणारा नायजेरीयन असा इशारा केला. त्याबरोबर सहायक पोलिस निरीक्षक बालाजी सानप, पोलिस अंमलदार चौधर, राठोड, खरात यांनी त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे रिपब्लिक ऑफ साऊथ अफ्रिकाचा पीटर कॅम्पबेल याच्या नावाचा पासपोर्ट, ५०० रुपयांच्या भारतीय बनावटीच्या १० नोटा, दोन मोबाईल, सॅकमध्ये भारतीय चलनातील ५०० रुपये किमतीच्या ४ नोटा असलेले एकूण २ हजार रुपये किमतीचे कोर्या कागदाचे बंडल, एक प्लॅस्टिकची बाटली असा १९ हजार १०० रुपयांचा माल मिळाला.



## तळेगाव एसटी बस डेपोतील महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान

तळेगाव दाभाडे : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत मेधावीण फाउंडेशनच्या वतीने तळेगाव दाभाडे एसटी डेपोतील (आगार) कार्यरत असणाऱ्या महिलांचा विशेष सन्मान करण्यात आला.

शनिवारी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा वैशाली दाभाडे यांनी तळेगाव आगारात जाऊन तिथे कार्यरत असणाऱ्या महिलांचा सत्कार केला. यावेळी फाऊंडेशनच्या स्वाती पवार, मीरा म्हस्के, जयश्री पाटील, सुनीता अगरवाल, मीनल गोळे, अमृता भेगडे उपस्थित होत्या.

वैशाली दाभाडे यांनी महिला सक्षमीकरण व सबलीकरण याबद्दल मार्गदर्शन करताना फाऊंडेशन करीत असलेल्या शैक्षणिक, आरोग्य व महिला सक्षमीकरण कार्याची माहिती दिली.

यावेळी तळेगाव आगार प्रमुख प्रमोद धायतोंडे, उपप्रमुख मीना पोटे, लेखापाल नेहा टाक, वरिष्ठ लिपिक रोमा काकडे, लिपिक प्रज्ञा पंदारे आदी महिला कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन वाहतूक नियंत्रक प्रमोद नखाते यांनी केले, तर आभार स्वाती पवार यांनी मानले.

# बारामतीत कामगाराचा व्यापाऱ्यावर हल्ला

**बारामती । प्रतिनिधी**

**शहरातील सम्यक लाइफ स्टाइलचे मालक आनंद किशोरकुमार छाजेड यांच्यावर शनिवारी (ता. ८) एका कामगाराने प्राणघातक हल्ला केला. यात छाजेड यांच्या दोन्ही डोळ्यांच्या मध्ये खोलवर जखम झाली असून. नाकाचे हाड फ्रॅक्चर झाल्याची माहिती डॉक्टरांनी दिली.**

दुकानातील एका कामगाराला छाजेड यांनी काही वर्षांपूर्वी कामावरून काढून टाकले होते. त्याने गेल्या दोन वर्षांत त्यांच्या दुकानात जाऊन तोडफोड करून गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला होता. बारामती शहर पोलिसांनी त्या वेळी त्याला अटक करून कारवाईही केली होती.

संबंधित कामगार शनिवारी हातात दगड घेऊन दुकानात घुसला, त्याने काचा फोडल्या. दुकानात असलेल्या छाजेड यांच्या अंगावर दगड घेत तो धावून गेला. त्याने त्यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. दगड डोक्यात लागू नये म्हणून मागे सरकलेल्या आनंद यांच्या चेहऱ्यावर दगड लागला. यात ते गंभीर जखमी झाले आहेत. बारामती शहर पोलिसांनी संबंधित हल्लेखोराला ताब्यात घेतले असून, त्याच्यावर गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे.

व्यापारी महासंघाकडून निषेध

बारामती व्यापारी महासंघाने या घटनेचा निषेध केला असून, सोमवारी (ता. ९) सकाळी ११ वाजता व्यापाऱ्यांचे शिष्टमंडळ पोलिसांना भेटून याबाबत निवेदन देणार आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांनीही या घटनेची दखल घेत तातडीने पोलिसांना कडक कारवाईच्या सूचना केल्या आहेत.

# अल्पवयीन मुलाकडून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**शिरूर । प्रतिनिधी**

इन्स्टाग्रामवर झालेल्या मैत्रीतून प्रेमाचे नाटक करीत एकाने मुलीला आपल्या घरी नेऊन अत्याचार केला. कारेगाव (ता. शिरूर) येथे घडलेल्या या प्रकारातील मुलगा व मुलगी अल्पवयीन आहेत. रांजणगाव एमआयडीसी पोलिसांनी आज याबाबत गुन्ह्याची नोंद केली.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कारेगावमधे राहणाऱ्या सोळावर्षीय मुलाने एका चौदा वर्षांच्या मुलीसोबत सोशल इन्स्टाग्रामवर ओळख करून मैत्री केली. दरम्यान या ओळखीतून प्रेमाचे नाटक करून मुलीला आपल्या घरी नेले. मला तू खूप आवडते, माझे तुझ्यावर खूप प्रेम आहे, असे म्हणत गुरुवारी (ता. ६) व शुक्रवारी (ता. ७) मुलीवर त्याने घरातच अत्याचार केले. मात्र, पीडित मुलीला घराबाहेर सोडताना, याबाबत कुणाला काही सांगितले तर जिवे मारून टाकीन, अशी धमकी दिल्याने घाबरलेल्या मुलीने कुटुंबीयांना हा प्रकार सांगितला.

पीडितेच्या कुटुंबीयांनी रांजणगाव एमआयडीसी पोलिसांकडे धाव घेत या प्रकाराची माहिती दिल्यानंतर पोलिसांनी अल्पवयीन मुलाविरुद्ध बाललैंगिक अत्याचार व अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल केला. या प्रकरणी विधीसंघर्षित मुलाला ताब्यात घेतले असून, शिरूरचे उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत ढोले व रांजणगाव एमआयडीसी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक महादेव वाघमोडे तपास करीत आहेत.